दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
www.epaper.rajyaloktantra.com email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-१२५ | शनिवार, दि.३० ऑगस्ट २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

# मराठवाड्यावर आस्मानी संकट;लाखो हेक्टरवरील पिकांची माती

बीड । प्रतिनिधी

**गेल्या चार दिवसांपासून मराठवाड्यात पावसाने हाहाकार माजवला आहे. अतिवृष्टीमुळे दोन हजार गावे पाण्याखाली गेले आहेत, शेतकऱ्यांचे सुमारे ५ लाख हेक्टरवरील पिके पाण्याखाली गेली आहेत. या आस्मानी संकटाने मराठवाड्यातील शेतकरी अडचणीत सापडला असून, शासनाकडून तात्काळ मदत मिळण्याची गरज आहे.**

पावसाळ्यापुर्वी म्हणजे मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात मराठवाड्यात जोरदार पाऊस झाला. यामुळे अनेक तलावात पाणी आले तर नद्या वाहू लागल्या. यामुळे शेतकरी आनंदात होता मात्र पावसाळा सुरू झाला आणि अपेक्षेप्रमाणे पाऊस पडलाच नाही. आगोदर पडलेल्या पावसावर आणि अगदीच थोड्याफार झालेल्या ▶▶ पान २ वर



## तात्काळ मदतीची गरज

महसूल विभागाकडून पंचनाम्यांचे काम संथ गतीने सुरू आहे. आजवर केवळ ५० टक्केच पंचनामे पूर्ण झाले असून उर्वरित काम अजून प्रलंबित आहे. शेतकरी मदतीच्या प्रतीक्षेत असताना यंत्रणेच्या कामकाजावर टीका होत आहे. शेतकऱ्यांना तात्काळ मदतीची गरज असून, शासनाने यासाठी प्रयत्न करावेत अशी अपेक्षा शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे.

## बदलत्या पावसामुळे शेती संकटात

पावसाचे असमान वितरण व अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कापूस, तूर, ज्वारी यांसारखी पिके उद्ध्वस्त झाली आहेत. अनेक ठिकाणी पिके पाण्याखाली गेली, तर काही भागांत पिकांना पाणी न मिळाल्याने उगवणच झाली नाही. मराठवाड्यातील शेतकरी दुहेरी फटक्याला सामोरे जात आहेत. एकीकडे पावसाची असमानता, तर दुसरीकडे पंचनाम्यांची संथ गती. येत्या काही दिवसांत सरकारने वेगाने मदत केली नाही, तर शेतकऱ्यांचे संकट आणखी गहिरे होईल.

## थोडक्यात...

### अतिवृष्टीने नांदेड जिल्ह्यात पुन्हा पूर परिस्थिती

नांदेडः जिल्ह्यामध्ये सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील नदी, नाल्यांना पूर आला आहे. तसेच नांदेड शहरात झालेल्या पावसामुळे शहरातील अनेक सखल भागात पाणी शिरले आहे. या परिस्थितीचा सामना करण्यासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद दल, एसडीआरएफ, सीआरपीएफ, नांदेड मनपा व स्थानिक शोध व बचाव पथकाच्या माध्यमातून शोध व बचाव कार्य युध्द पातळीवर सुरु आहे. पूर परिस्थिती नियंत्रणात आहे. प्रशासनकडून योग्य ती खबरदारी घेतली जात असून सर्व यंत्रणासोबत संपर्क व समन्वय ठेवून जिल्हा प्रशासनाची कारवाई सुरु आहे. या परिस्थितीत नागरिकांनी अति आवश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

### महिलांसाठी देशात मुंबई सर्वाधिक सुरक्षित

मुंबई:देशात दररोज महिलांवरील हिंसाचार, गुन्हे आणि हत्येच्या बातम्या समोर येतात. दरम्यान, राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी नुकताच महिला सुरक्षेवरील राष्ट्रीय वार्षिक अहवाल जहीर केला आहे. यातून धक्कादायक माहिती समोर आली आहे. अहवालानुसार, देशाच्या शहरी भागातील ४० टक्के महिलांना असुरक्षितेता वाटते. या अहवालासाठी ३१ शहरांमधील १२,७७० महिलांचे सर्वेक्षण करण्यात आले. गेल्या काही दिवसांत अशा अनेक हृदयद्रावक घटना समोर आल्या आहेत, ज्यामुळे पालकांची चिंता आणखी वाढली आहे. कोणत्याही देशात महिलांची सुरक्षितता हा एक मोठा मुद्दा आहे.

### जरांगेंच्या आंदोलनाविरोधात सदावर्तेंची पोलिसांत तक्रार

मुंबई : मराठा आरक्षणासाठी मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी ऐन गणेशोत्सवात आंदोलन पुकारले आहे. मुंबई येथे त्यांचा मोर्चा पोहचला असून मुंबईत प्रंचड गर्दी झाली आहे. त्यामुळे वकील गुणरत्न सदावर्ते यांनी या मोर्चाच्या विरोधात पोलीस महासंचालकांकडे तक्रार दाखल केली असून, या आंदोलनात कोर्टाच्या विरोधात जाऊन रास्ता रोको केला जातोय असा आरोप केला आहे. तसेच या मोर्चामध्ये कोणत्याही प्रकारच्या नियमांचे पालन केले जात नाही असेही म्हटले आहे. वकील गुणरत्न सदावर्ते यांनी आंदोलकांवर त्वरित कारवाईची मागणी केली आहे. त्यांनी पोलीस महासंचालक, मुंबई पोलीस आयुक्त व आझाद मैदान पोलीस स्थानकात तक्रार दाखल केली आहे.

### मुख्यमंत्री नितीश कुमार यांची महिलांसाठी घोषणा

पाटणा : बिहारमध्ये मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी राज्यातील प्रत्येक कुटुंबातील एका महिलेला आपल्या आवडीचा रोजगार सुरू करण्यासाठी आर्थिक सहकार्य प्रदान करण्याच्या हेतूने एक योजना सुरू करण्याची घोषणा केली आहे. याबाबत बोलताना मुख्यमंत्री नितीशकुमार म्हणाले, यासंबंधी एका प्रस्तावास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत महिलांच्या रोजगारासाठी मुख्यमंत्री महिला रोजगार योजना ही नवीन योजना आमच्या सरकारने मंजूर केली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश राज्यातील सर्व कुटुंबातील एका महिलेला त्यांच्या आवडीचा रोजगार सुरू करण्यासाठी आर्थिक मदत देणे आहे.

### फडणवीसजी आरक्षणाचे काय झाले -सपकाळ

मुंबईः मराठा आरक्षण देण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती लागते आणि तीच भाजपा व देवेंद्र फडणवीस यांच्याकडे नाही. हा आजचा प्रश्न नसून अनेक वर्षापासूनची ही मागणी आहे. मराठा समाजाला दिलेले आरक्षण भाजपा व फडणवीस सरकारने सुप्रीम कोर्टात इम्पिरिकल डेटा दिला नाही म्हणून गेले. सत्ता द्या ७ दिवसात मराठा आरक्षण देतो अशी वल्गणा करणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांच्या घोषणेच काय झाले? असा संतप्त सवाल काँग्रेस प्रदेशाअध्यक्ष सपकाळ यांनी केला.

# मराठ्यांच्या डोक्यावर गुलाल टाकल्याशिवाय हटणार नाही

## मनोज जरांगे पाटील यांचा निर्धार, आझाद मैदानावर बेमुदत उपोषणाला सुरुवात







मुंबई । प्रतिनिधी

**पोलिसांनी मराठा आरक्षण प्रश्नी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखालील मराठा समाजाला आझाद मैदानावर आंदोलन करण्यास एक दिवसाची परवानगी दिली. त्यानंतर शुक्रवारी सकाळी आझाद मैदानावर मनोज जरांगे पाटील यांचे आमरण उपोषणाचे आंदोलन सुरु झाले. त्यावेळी राज्याच्या विविध भागातून आलेल्या मराठा आरक्षण समर्थक आंदोलनकांना संबोधित करताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मला आणि माझ्या समाजाला फक्त आरक्षण पाहिजे. पण सरकार जर त्याचे राजकारण करणार असेल तर तुम्ही गोळ्या घातल्या तरीमी मागे हटणार नाही. जेलमध्ये घातले तर मी जेलमध्येही उपोषण करेन पण मराठ्यांच्या डोक्यावर गुलाल टाकल्याशिवाय मागे हटणार नाही, असा निर्धार यावेळी त्यांनी व्यक्त केला.**

पुढे बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, राज्य सरकारने मराठा समाजाच्या सगळ्या मागण्या मान्य कराव्यात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मराठ्यांचे मन जिंकायची ही आयती संधी आहे. मुख्यमंत्र्यांनी मराठ्यांच्या नाराजीची लाट अंगावर घेऊ नये असा इशाराही यावेळी दिला. मनोज जरांगे- पाटील यांनी २७ ऑगस्ट रोजी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी गावातून हजारो समर्थकांसह आपल्या मराठा समाजाच्या मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी मुंबईच्या दिशेने कूच केली. जालना, बीड, अहिल्यानगर, शिवनेरी किल्ला, चाकण, तळेगाव, खोपोली, पनवेल, वाशी, चेंबूर मार्गे मनोज जरांगे पाटील यांच्यासोबत हजारो गाड्यांचा ताफा शुक्रवारी सकाळी १० च्या सुमारास आझाद मैदानावर पोहोचला. दरम्यान ठिकठिकाणी मनोज जरांगे पाटील यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. आझाद मैदानात पोहोचताच मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत आलेल्या मराठा बांधवांना शांततेचे आवाहन करत काही सूचना केल्या. यावेळी बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले, राज्य सरकारने आपल्याला सहकार्य केले आहे. आता आपणही सरकारला सहकार्य करावे. समाजाला ▶▶ पान २ वर

### विरोधकांनो, पोळी भाजू नका, तोंड भाजेल - फडणवीस



विरोधी पक्षाचे नेते जरांगे यांच्या आंदोलनावरून सरकारला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न करत आहेत. यावरून मुख्यमंत्री फडणवीस यांनी विरोधकांना आंदोलनावर पोळी भाजण्याचा प्रयत्न करू नका, तुमचे तोंड भाजेल असा कडक इशारा दिला आहे. मीडियाला प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शेवटी आमचा एकच प्रयत्न आहे, की कुठल्याही परिस्थितीत दोन समाज एकमेकांच्या समोर येवून उभा राहिलेले आहेत, अशी परिस्थिती महाराष्ट्रात निर्माण होवू नये. म्हणून ओबीसी समजालाही आपल्याला सांभाळावे लागेल.

### » सरकार इंग्रजांपेक्षाही बेकार - मनोज जरांगे

नाटक का खेळले जात आहे. आंदोलनास परवानगी देणे सरकारच्या हातात आहे. मला गोळ्या घालून मारणेही सरकारच्याच हातात आहे. पोरांना अडवायचे का सोडायचे हेही सरकारच्याच हातात आहे. मराठा समाजाच्या मुलांना त्रास न दिल्यास तेही काहीच करणार नाहीत. मराठा समाजाच्या मुलांना लघवी करण्याचीही सोय नाही. वडापाव किंवा इतर खाद्यपदार्थांची दुकाने बंद करण्यात आली आहेत. पाणी प्यायचीही सोय नाही. मराठ्यांनी कंटाळून मुंबई सोडून जावे असा यामागे डाव आहे. तुम्ही इंग्रजांपेक्षाही क्रूर झाले आहेत, अशी टीका मनोज जरांगे यांनी यावेळी केली आहे.

### » विविध पक्षांच्या आमदार - खासदारांचा पाठिंबा

मनोज जरांगे पाटील यांनी आझाद मैदानावर बेमुदत उपोषणाचे आदोंलन सुरु केल्यानंतर आंदोलना पाठिंबा देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार विजयसिंह पंडित, प्रकाश सोळंखे, शिवसेना ठाकरे पक्षाचे आमदार कैलास पाटील, खासदार ओमराजे निंबाळकर, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे खासदार बजरंग सोनावणे, निलेश लंके, आमदार संदीप क्षीरसागर, अभिजित पाटील यांच्यासह विविध राजकीय पक्षाच्या आमदार खासदारांनी आंदोलनस्थळी भेट घेत आपला पाठिंबा जाहिर केला.

### » मुदत संपली मात्र लगेच मुदतवाढ मिळाली

जरागेंनी यांनी आंदोलनस्थळावरून बोलताना आता मागे हटणार नसल्याचा निर्धार केला आहे. हजारोंच्या संख्येने मराठा आंदोलन मुंबईत दाखल झाले आहेत. यामुळे मुंबईतील वाहतूक व्यवस्थेचे तीन तेरा वाजले आहेत. त्यातच, जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या परवानगीबाबत मुंबई पोलिस दलातील वरिष्ठ पातळीवरील अधिकाऱ्यांनी चर्चा करुन १ दिवसाच्या मुदतवाढीचा निर्णय घेतला. त्यामुळे उद्या देखील हे आंदोलन असच सुरु राहणार आहे. आंदोलनासाठी परवानगी मिळावी यासाठी आझाद मैदान पोलिसांकडे जरांगे पाटील यांच्याकडून अर्ज करण्यात आला होता. दरम्यान, मनोज जरांगेंच्या आंदोलनास मुदतवाढीची परवानगी दिली आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयात अंगावर डिझेल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न

बीड । प्रतिनिधी

केज तालुक्यातील कासारी येथील रामहरी महादेव वायबसे व त्यांचे कुटूंब १५ ऑगस्टपासून आपल्या विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसलेले आहेत. रामहरी वायबसे यांचे सख्खे भाऊ डॉ.संभाजी वायभसे यांच्याकडून व गुंडांमार्फत अनेकदा मारहाण झाल्याचा आरोप रामहरी वायबसे यांनी केलेला आहे. त्यांच्याविरूध्द कारवाई करावी यासाठी ते सपत्नीक उपोषणाला बसलेले आहेत. मात्र प्रशासन उपोषणाची कसलीच दखल घेत नसल्याने रामहरी वायबसे यांनी आज ▶▶ पान २ वर



# आरक्षण नाही हा तर सरकार पाडण्याचा कट-लक्ष्मण हाके

पुणे । प्रतिनिधी



मनोज जरांगे पाटील यांचे हे आंदोलन मराठा आरक्षणासाठी नाही तर राज्यातील सरकार उलथून टाकण्यासाठीचा एक अजेंडा आहे. या कटात विरोधी पक्षासह सत्ताधारी अजित पवार गटाचे आमदार, खासदारदेखील सहभागी आहेत, असा गंभीर आरोप ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत केला. पुणे श्रमिक पत्रकार संघात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

हाके म्हणाले, जरांगे नावाच्या चेहऱ्याआडून राज्यातील आमदार, खासदार सरकार अस्थिर करण्याचा प्रयत्न करत आहेत. जरांगेंची मागणी मान्य झाली तर ओबीसींचे आरक्षण संपणार आहे. जरांगे पाटील हुकूमशहा आहेत का?, झुंडशाहीच्या जोरावर महाराष्ट्रातील ओबीसी रचना संपवण्याचा घाट टाकला जात आहे. मनोज जरांगेंच्या नावाच्या काडेपेटीचा ज्वालामुखी केला. हे काम ▶▶ पान २ वर

### खताचे १२ नुमूने निकृष्ट

**बीड :** कृषीच्या गुणनियंत्रण विभागाने जिल्हा भरातील खत व बियाण्यांचे नमुने तपासणीसाठी पाठवली होती. त्यात १६ कंपन्यांचे ३३ नमुने निकृष्ट असल्याचा अहवाल प्राप्त झाला. किटकनाशकाचे ५४ अहवाल प्रलंबित आहेत. खरीप हंगाम ▶▶ पान २ वर

# देवबाप्पा,समुद्राच्या भेटीला मराठ्यांचा सागर आलाय

**भाग-दुसरा**

**सुभाष चौरे**

**पुणे/ बीड। गणपती बाप्पा तुम्ही दहा दिवसाच्या मुक्कामावर आलात हिंदू संस्कृतीमध्ये पाहुण्याकडे कोणतेही गऱ्हाणेन मांडता त्यांचे आलेले दिवस आनंदात कसे जातील हेच पाहिले जाते पण आपण देवाचे देव आहात असे म्हटले तरी वागे ठरणार नाही पण आता आमची व्यथा तुम्हीच ऐकू शकतात गोरगरीब कष्टकरी अठरा विश्व दारिद्र्यात असलेल्या मराठा समाजाच्या भावना घेऊन राज्यातील मराठा समाजाचा हा जनसागर तुमच्या पुण्यनगरीला स्पर्श करत मुंबईतल्या अरबी समुद्राच्या भेटीला आला आहे त्यांच्या व्यथा जाणून त्यांच्या मागण्या मान्य करायला सरकारला बुद्धी द्यावी एवढीच माफक अपेक्षा हा किचकट प्रश्न असला तरी सोडवायचा कसा याचे उत्तर ही तुमच्याकडेच आहे म्हणूनच तुमच्यापुढे ही मागणी तुमचे भक्त म्हणून करत आहोत.**

गणपती बाप्पा ही मागणी आत्ताच करतो अशी नाही गेल्या अनेक वर्षांपासून यासाठी लढा सुरू आहेत मग ते स्वर्गीय विनायक मेटे असो त्यांचे गुरु स्वर्गीय अण्णासाहेब पाटील असो की आत्ताचे मनोज जणांनी असो यांनी गरीब मराठ्यांना आरक्षण मिळावे म्हणून आपली हयात घातली



मध्यंतरीच्या काळात देवबाप्पा या समाजाला एकनिष्ठ समाजासाठी लढणारा नेता मिळाला नव्हता आज नेता मिळाला त्यावर या समाजाने विश्वास टाकला आता त्या विश्वासाला तळा जाऊ नये म्हणून अंगाने बारीक दिसत असला तरी समाजासाठी मोठा प्रयत्न करत असलेला हा जरांगे तुमचाही भक्त असेलच मग अशा भक्तावर ही वेळ का बरं येऊ द्यायची देवबाप्पा तुम्हाला सर्व भक्त सारखेच मग तुझ्या भाव का करतात गेल्या अनेक वर्षापासून गरीब मराठा समाजाला आरक्षण मिळावे ही एवढीच माफक अपेक्षा आहे तुम्ही तर बुद्धी देवता तुम्हाला आरक्षणाऐवजी बुद्धिमत्ता आणि गुणवत्ता या गोष्टी आवडीच्या असतील पण ▶▶ पान २ वर



## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२१ ऑगस्ट २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५.५० क्विंटल | २,५६१ | २,७१६ | २,६५९ |
| ज्वारी/हायब्रिड :६२.०० क्विंटल | २,१५० | २,६४५ | २,४३१ |
| मका/लोकलः१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : ४.०० क्विंटल | ६,००० | ६,१०० | ६,०५० |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,४५० | ४,४५० | ४,४५० |
| बाजरी: २८.०० क्विंटल | १,८०० | २,८५२ | २,५११ |
| मुग: १.०० क्विंटल | ८,१९१ | ८,१९१ | ८,१९१ |
| सोयाबीन: ०.५० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ५,८०० | ५,८०१ | ५,८०० |

अग्रलेख

# मतदारराजा म्हणतोय... आता आठवण झाली का?

गेली दोन वर्ष निवडणूका लाबणीवर आहेत त्यामूळे महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायतसमितीमध्ये अधिकारी राज आहे. मतदार राजा मतदान कधी होणार म्हणुन वाट पाहत नसला तरी भावी मात्र अतुरतेने वाट पाहत आहेत. यात जनता भरडली जाते त्यांची कामे रखडली जात आहे. आता पावसाळ्यातील छत्र्या प्रमाणे नेते ही अचानक उगतील. तेव्हा हाच मतदार राजा म्हणेल आता आमची आठवण झाली का?

जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारत देशाकडे पाहिले जाते. एक व्यक्ती एक मत असे गुप्त मतदान होत आहे. पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी पंचायत राज सुरू केले. तेव्हापासून सहकारी सोसायट्या कारखानदारी, ग्रामपंचायती, पं.स., जि.प., नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका, विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांमध्ये १८ वर्षांवरील प्रत्येक नागरिकाला मतदानाचा हक्क दिला आहे. समाजामध्ये अनेकांकडून समाजाभिमुख कामे केली जात आहेत. त्यामुळे निवडणुकांपूर्वी चळवळ असते आणि निवडणुका जवळ आल्या की प्रत्येक कार्यकर्त्याची वळवळ सुरू होते. तिकीट मिळविण्यापासून ते निवडून येण्यासाठी आटोकाट प्रयत्न केला जातो. मात्र, अलीकडे निवडणुकांना ओंगळ स्वरूप प्राप्त झाले आहे, ही बाब अनेकांना खटकत आहे. मात्र, त्याविषयी उघड कोणी बोलायला तयार नाही. मतचोरीचा प्रकार प्रत्येका खटकत आहे, बोलत आहे. मात्र, पुढाकार कोणी घ्यायचा हा प्रश्न होता. त्यात खासदार राहुल गांधी यांनी मतचोरीचा प्रकार थेट पुराव्यानिशी दाखवला. त्यानंतर प्रत्येकाने मत मांडायला सुरुवात केली आहे. तीन वर्षांच्या प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे बिगुल वाजले आणि आजी-माजींसह इच्छुकांनी न केलेल्या कामांचा लेखाजोखा गुळगुळीत कागदावर बुळबुळीत अक्षरात रेखाटून मतदारांपर्यंत पोहोचवत आहे. मात्र, मागिल निवडणुका रखडल्यानंतर ही मंडळी कुठल्या बिळात लपली होती, असा सवाल मतदारराजा थेट उपस्थित करू लागला आहे. मागिल तीन वर्षांपासून प्रशासकीय कारभारात नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोयींचा सामना करावा लागला. महापालिकेच्या २०१७ च्या निवडणुकीत चार सदस्यांच्या प्रभागातून निवडून आलेल्या नगरसेवकांनी संपूर्ण प्रभागात विकासकामे न करता इतर सदस्यांच्या संमतीने प्रभागाचे तुकडे करून बगलबच्च्यांना सांभाळले. त्यामुळे आता नागरिकांकडून एवढे दिवस कुठे होता, अशी विचारणा करण्यासाठी सज्ज झाला आहे. त्यामुळे अनेक इच्छुकांना रात्रीच्या वेळी प्रभागांच्या हद्दी तपासण्यासाठी बाहेर पडण्याची वेळ आली आहे. महापालिकेच्या २०१७ च्या निवडणुकीत चार सदस्यांच्या प्रभागात निवडून आलेल्या नगरसेवकांनी संपूर्ण प्रभागात समान विकासकामे न करता आपापसात विभागणी केली. त्यानुसार, पाच वर्षे प्रत्येक नगरसेवक फक्त आपल्या भागातच काम करीत राहिला. इतर भागातील समस्यांकडे दुर्लक्ष झाले. नागरिकांनी तक्रार केल्यास तो भाग माझा नाही, असे सांगून त्याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले जात होते. त्यामुळे कोणत्याही प्रभागाचा नियोजित विकास झाला नाही. उलट भकास झाला आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. आता प्रभाग रचना बदलल्याने प्रशासनाने केलेली कामे पण स्वतःच्या नावावर खपवलेली दाखवण्याचा केविलवाणा प्रकार सुरू झाला आहे. सोशल मीडियावर फोटोसेशन करण्यात कार्यकर्त्यांनी आघाडी घेतली आहे. त्याच माध्यमातून इच्छुक माजी नगरसेवक म्हणून लोकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करीत आहेत. मात्र, मतदारराजा आता थेट विचारू लागला आहे, एवढे दिवस कुठे होता. आता तुम्हाला आमची आठवण झाली का, ड्रेनेज नाही, पाणी नाही, रस्ता नाही, कचरा उचलण्याची व्यवस्था नाही, अशा अनेक समस्यांचा पाढाच मतदारराजा विचारू लागला आहे. त्यामुळे इच्छुकांवर मोठी नामुष्की ओढवली आहे. महापालिकेच्या निवडणुका २०२२ मध्ये होणे अपेक्षित होत्या. मात्र, ओबीसी आरक्षणाची सुनावणी सुरू असल्याने त्या गेल्या तीन वर्षांपासून त्या रखडल्या. या कालावधीत महापालिकेवर प्रशासक कारभार सुरू होता. नागरिकांना दैनंदिन समस्या आणि छोट्या कामांसाठीही मनस्ताप सहन करावा लागला. अशा वेळी नागरिकांनी माजी नगरसेवकांकडे धाव घेतली असता त्यांनी, आम्ही नगरसेवक नाही, प्रशासन काम करीत नाही, त्यामुळे आम्ही काहीच करू शकत नाही, असे सांगून हात वर केले. आता मात्र निवडणुका आल्यावर तेचनगरसेवक मदारांपर्यंत पोहोचत आहेत. त्यामुळे तीन वर्षांपासून कुठे गेला होता. राज्यातील पुणे-मुंबई आणि ठाण्यासह सर्व महानगरपालिका निवडणुका जिंकण्यासाठी सत्ताधाऱ्यांसह विरोधकांनी चांगली मोर्चेबांधणी सुरू केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर की एकत्र लढणार याचे उत्तर अद्याप गुलदस्त्यात आहे. आता इच्छुकांची संख्या जास्त झाली असून, तिकीट वाटप कसे करायचे असा पक्षश्रेष्ठींपुढे मोठे आव्हान आहे. तिकीट दिल्यानंतर नाराज गट कसा सांभाळणार हाही प्रश्न आहे. तिकीट मिळाले नाही, तर दुसऱ्या पक्षाकडून तिकीट घेणार किंवा स्वबळावर लढण्याची अनेकांनी तयारी ठेवली आहे. अभी नही तो कभी नही हीच भूमिका अनेकांनी ठेवली आहे. मागिल तीन वर्षांपासून निवडणुका रखडल्याने प्रत्येक जण आता निवडणुकीत उतरायचे या तयारीत आहेत. पक्षनिष्ठा आता किती शिल्लक राहिली हे तिकीट वाटपानंतर दिसून येईल. उमेदवारांनी मतदारांना गृहित धरून चालणार नाही. मतदारही वेट अँड वॉचच्या भूमिकेत आहे. आपली कामे कोणी केली हे त्याने पाहिले आहे. त्यामुळे गुळगुळीत कागदावर बुळबुळीत अक्षरांना तो फसणार नाही, हे त्रिकालाबाधित सत्य आहे. सोशल मीडियावरील फोटोसेशन गमतीचा विषय झाला आहे. कोणाचीही कामे स्वतःच्या नावावर खपविण्याचा प्रकार म्हणजे सोशल मीडिया आहे, अशी उघड उघड चर्चा सुरू झाली आहे. मतदारराजा पक्ष पाहणार की उमेदवार पाहणार हा महत्त्वाचा आणि कळीचा मुद्दा आहे. आजही ६०तील मतदारवर्ग पक्षनिष्ठा आणि व्यक्तीला मानणारा आहे. मात्र, यंग जनरेशन त्या मानसिकतेत राहिला नाही. गरिबांचा कळवळा, समाजसेवा राहिली नाही, फक्त स्वतःपुरते पाहण्याची वृत्ती राजकारण्यांची झाली आहे. पांढरी शुभ्रवस्त्रे अंगावर आणि चार बगलबच्चे बरोबर घेऊन यात्रा, जत्रा, वाढदिवस, सण, समारंभ, लग्न, साखरपुडा, बैलगाडा शर्यत अशा कार्यक्रमांना हजेरी लावायची आणि समाजसेवक म्हणून मिरवण्याची प्रथा आता रूढ झाली की काय असाही जाणकारांकडून प्रश्न उपस्थित केला आहे. पाऊस पडला की भूछत्र्या उगवतात, तशा पद्धतीने एरवी चळवळ म्हणून काम करणारेसुद्धा तिकीटासाठी वळवळ करू लागले आहेत.

## प्राणघातक हल्ला प्रकरणातील आरोपी अद्याप मोकाट

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील घराजवळील परिसरात प्राणघातक हल्ला झाल्याच्या प्रकरणात गुन्हा दाखल होऊनही आरोपींना अद्याप अटक करण्यात आलेली नाही. त्यामुळे न्याय मिळावा या मागणीसाठी तक्रारदार फैमीदा रईस शेख यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे उपोषणाला बसण्याचा इशारा दिला आहे.

या प्रकरणातील माहिती अशी की, २५ ऑगस्ट २०२५ रोजी फैमीदा रईस शेख या आपल्या घराजवळील परिसरात असताना, मोमीन ताहेर उर्फ चिंटू, मोमीन मस्जिद आणि मोमीन मुस्तका या तिघांनी संगनमत करून त्यांच्यावर तलवारसदृश धोकादायक हत्याराने प्राणघातक हल्ला केला. यावेळी आरोपींनी त्यांच्यासोबत असभ्य वर्तन करत शिवीगाळ केली तसेच जिवे मारण्याची धमकीही दिली. घटना सार्वजनिक ठिकाणी घडली असून, परिसरातील नागरिकांच्या उपस्थितीत आरोपींनी कोणतीही भीती न बाळगता हा हल्ला केल्याचे फैमीदा शेख यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे. या प्रकरणी पेठ बीड पोलीस ठाण्यात बीएनएस कलम ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी घटनास्थळी आरोपींकडून तलवारसदृश हत्यार देखील जप्त केल्याचे समजते. तरीही, गुन्हा दाखल होऊन काही दिवस उलटून गेले तरी आरोपी मोकाट फिरत असून, पोलीस प्रशासनाकडून कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. सदर आरोपी समाजात दहशत निर्माण करणारे, नशा करणारे आणि हिंसक वर्तन करणारे असल्याचा आरोप तक्रारदार यांनी केला आहे. याप्रकरणी त्यांनी पोलीस आणि प्रशासनाकडे पुन्हा एकदा तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली असून, येत्या आठ दिवसांत आरोपींना अटक न केल्यास छत्रपती संभाजीनगर येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू करण्याचा इशारा दिला आहे.

## संभाजीनगर एलसीबीने २३ लाखाचा गांजा पकडला

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

**दाभरूळ शिवारात एलसीबीच्या पथकाने मिळालेल्या माहितीवरून एका पत्र्याच्या शेडमध्ये छापा मारला असता या ठिकाणी ६७ किं.५०० ग्राम गांजा पकडला या ठिकणी असलेल्या चौघाना त्यांच्याकडील ईतर मुद्देमाला २० लाखाचा गांजा व ईतर साहीत्य असा २३ लाखा रूपयाचा मुद्देमाला ताब्यात घेण्यात आला.**



पाचोड परिसरात गस्तीवर असतांना महेश घुगे, पो.उप.नि. यांना गोपनीय बातमीदारा मार्फत माहिती मिळाली कि, दाभरूळ शिवारातील शेता मध्ये असलेल्या पत्र्याचे शेडमध्ये काही ईसम हे स्वत:चे फायद्यासाठी बेकायदेशिररित्या स्वत:च्या फायद्यासाठी चोरटया मार्गाने गांजाची विक्री करत आहे अशी माहिती मिळाली असता या अनुषंगाने पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षकअन्नपूर्णा सिंह, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विजयसिंग राजपुत यांनी स्था.गु.शाचे पथकाला सापळा लावुन कारवाई करण्याचे सुचना दिल्या. यावरून पथकाने विशेषांतर करून व्यापारी असल्याचे भासवुन गांजा खरेदी करणे असल्याबाबत गोपनीय बातमीदारा मार्फत बातमी संशयीत ईसमापर्यंत पोहचवली. यावरून पथकाने व्यापा-याचे वेशात दाभरूळ शिवारातील शेतात गेले असता तेथे एका पत्र्याचे घराजवळ उभा असलेला ईसम रमेश विजयसिंग नारेडा यांची भेट घेवुन त्याला पथकाने व्यापारी असल्याचे सांगुन त्याचा विश्वास संपादन करुन त्याने सांगितलेल्या भावात गांजा खरेदी करण्याची संमती दर्शविल्याने त्याने त्याचे इतर ६ साथीदार यांना बोलावुन घेतले. परंतु पथकाचे हालचालवरुन त्यांना संशय आल्याने व पोलीसांची चाहुल लागल्याने त्यांनी तेथुन पलायन केले असता पथकाने शिताफिने पाठलाग करून १) रामसिंग कारभारी जारवाल वय ३१ वर्षे २) रमेश विजयसिंग नारेडा वय ३५ वर्षे ३) रामेश्वर त्रिंबक बमनात वय २४ वर्षे ४) मितशाम वैष्णव वय १९ वर्षे यांना ताब्यात घेवुन त्यांना विश्वासात घेवुन विचारपुस करता त्यांनी पंचा समक्ष शेतवस्तीवरिल घराचे आतील खोलीत ०४ मोठया गोण्यामध्ये सुकलेला गांजा लपवून ठेवलेला दाखविला. पथकाने सहाय्यक वैज्ञानिक व रासायनिक विश्लेषकांचे मदतीने गोण्या उघडुन पाहिले असता त्यामध्ये हिरवट रंगाचा आम्ली पदार्थ ज्याचा उग्रवास असलेला वाळलेली पाने, फुले, बिया, असा आम्ली पदार्थ (गांजा) मिळुन आल्याने त्याचे वजनमापे तज्ञ यांचे मार्फतीने वजन केले असता सुकलेला गांजा हा ६७ किलो ५०० ग्रॅम ज्यांची किं.अं. २०,२५,०००/- रुपये एवढी असुन ०४ मोबाईल फोन व ०३ दुचाकी असा एकुण २३,७६,०००/- रुपयांचा मुद्देमाल पोलीसांनी जप्त केला आहे. आरोपीकडे त्यांचे पळुन गेलेल्या साथीदारा बाबत विचारपुस करता त्यांनी त्यांची नावे १) केसरसिंग धनसिंग जारवाल, २) निलेश ऊर्फ बंदी बाबुलाल सुलाने ३) आनंद प्रताप जारवाल असे असल्याची सांगितले आहे. नमुद आरोपी विरूध्द पोलीस ठाणे पाचोड येथे गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ (एन.डी.पी.एस.) मधील कलम ८ (क), २० (ब), २ (ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आला आहे. पुढील तपास पाचोड पोलीस करित आहेत.नमुद कारवाई ही पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह, उपविभागीय पोलीस अधिकारी, पैठण सुनिल पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विजयसिंग राजपूत, स.पो.नि. पाचोड सचिन पंडीत, पो.उप.नि महेश घुगे,पो.उप.नि. श्रेणी बारहाते पो.उप.नि. बळीराम काकडे, पोलीस अंमलदार श्रीमंत भालेराव, प्रमोद पाटील, अंगद तिडके, दिपक सोराशे,सचिन राठोड, बलबीरसिंग बहुरे, शिवाजी मगर यांनी केली आहे.

## जालन्याजवळ कार विहिरीत कोसळली पाच जणांचा मृत्यू





जालना । प्रतिनिधी

**टेंभूर्णी-राजूर रोडवरील शिवार परिसरात एका कारचे अचानक नियंत्रण सुटले आणि ती कार विहिरीत जाऊन पडली. या भीषण अपघातात कारमधील पाच जणांचा मृत्यू झाला आहे. ही कार एका रुग्णाला उपचारासाठी सुलतानपूरला घेऊन जात होती आणि याच दरम्यान हा अपघात झाल्याची माहिती आहे.**

जाफराबाद तालुक्यातील टेंभूर्णी-राजूर रोडवरील गाडेगव्हान फाट्याजवळ हा भयंकर अपघात घडला. ह्युंदाई कंपनीची आय २० गाडी फुलंब्री तालुक्यातील गुंगी गेवराई येथून ज्ञानेश्वर भाऊसाहेब डकले, निर्मला सोपान डकले (रा.गुंगी गेवराई),पद्माबाई लक्ष्मण भामीरे, ज्ञानेश्वर लक्ष्मण भामीरे (रा. कोपर्डा ता. भोकरदन) आणि चालक असे पाच जण नातेवाईकासोबत पॅरलेसिस उपचार घेण्यासाठी मेहकर तालुक्यातील सुलतानपूर जाण्यासाठी निघालेले होते. प्रत्यक्षदर्शींच्या मते, ही घटना सकाळी पाचच्या सुमारास घडल्याची माहिती आहे. चालकाने मॉर्निंग वॉक करणाऱ्या लोकांना वाचवण्याचा प्रयत्न केल्याचे सांगण्यात येत आहे, त्यादरम्यान कार अनियंत्रित झाली आणि थेट विहिरीत जाऊन पडली. अपघातानंतर तिथे उपस्थित असलेल्या ग्रामस्थांनी आरडाओरडा केला आणि जवळच्या लोकांना जमा केलं. तात्काळ पोलिसांना माहिती दिली. घटनास्थळी सकाळीच पोलिस प्रशासनाने धाव घेतली. मात्र विहिरीची खोली जवळपास ७० फूट असून पाणीपातळी ६० फुटापर्यंत असल्याने अग्निशमन दल आणि एनडीआरएफ टीम बोलावण्यात आली असून शर्थीचे प्रयत्न सुरू होते. बचाव कार्यात गाडीतील पाच जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. जखमींना उपचारासाठी जालना येथील कलावती हॉस्पिटल दाखल असल्याचे कळाले आहे.

## ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी घेतला आढावा

बीड । प्रतिनिधी

**महाराष्ट्र ठेविदारांच्या (वित्तीय संस्थामधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ (एमपीआयडी ॲक्ट १९९९) अन्वये ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासंदर्भात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत श्री. जॉन्सन यांनी ठेवीदारांच्या ठेवी परत करण्यासंदर्भात संबंधीत विभागानी केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर आढावा घेतला.**



यावेळी बैठकीस पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, आर्थिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक एस.एस.शेजाळ, गुन्हे अन्वेषण विभाग छत्रपती संभाजीनगरचे पोलीस अधिक्षक यशवंत काळे, सहजिल्हा निबंधक वर्ग-२ बीडचे एस.एम.शेख, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, लातूर विभागचे फडणवीस सर, सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी बीड / माजलगावचे गौरव इंगोले, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था बीडचे सतीश तोतावार, जिल्हा सरकारी वकील धनंजय वाकनकर, अवसायक सर्व वित्तीय संस्थाचे आर.एम.तोटे, श्री. साई अर्बन मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.बीडचे व्यवस्थापक सचिन घोडके, ज्ञानराधा मल्टी स्टेट को-ऑप क्रेडीट सोसायटी लि. बीडचे संपर्क अधिकारी गोपाळकृष्ण परदेशी, मॉ जिजाऊ मल्टीस्टेट को-ऑप सोसायटी, बीडचे व्यवस्थापक सुरज जगदाळे यांची उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी एमपीआयडी संदर्भातील कामकाज गतीने होण्यासंदर्भात मा. जिल्हा मुख्य न्यायाधीश यांना पत्र देवुन सर्व कोर्टाची बैठक घेण्याबाबत विनंती करण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच ज्या प्रकरणामध्ये अधिसूचना प्रसिध्द झालेल्या नाहीत, त्या संदर्भात अपर मुख्य सचिव (गृह) यांना पत्र देवून अधिसूचना प्रसिध्द करुन सक्षम प्राधिकारी नेमणेबाबत विनंती करण्यात येणार आहे. सर्व अवसायक यांना त्यांची कार्यपध्दती निश्चित करणेबाबत सूचित करण्यात आले आहे. तसेच नोंदणी महानिरीक्षक आणि मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य यांना पत्र देवून मालमत्तांच्या मुल्यांकना संदर्भातील माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी एक नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यासाठी विनंती करण्यात आल्याचे सांगितले. तसेच या विषयावर पुढील बैठक एक महिन्यानंतर घेण्यात येणार असल्याचे ही यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सांगितले.

## पान १ वरून...

### मराठवाड्यावर आस्मानी संकट

पावसावर शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या. थोडा थोडा आणि कुठे कुठे पाऊस पडत गेला. यात दोन महिने गेले. पिके संकटात येण्याची परिस्थिती निर्माण झाली मात्र ऑगस्ट महिन्यात चांगली सुरूवात झाली. यामुळे मराठवाड्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असतानाच गेल्या चार दिवसांपासून अती पावसाने शेतकऱ्यांची चिंता वाढविली आहे. सतत पाऊस सुरू असल्याने शेत पिके धोक्यात आली आहेत. याशिवाय अनेकांचा बळी गेला असून शेकडो जनावरे दगावली आहेत. सर्वाधिक फटका नांदेड जिल्ह्याला बसला आहे. मराठवाड्यात यंदा पावसाचे वितरण विस्कळीत झाल्याने खरीप हंगामातील शेतकरी मोठ्या संकटात सापडले आहेत. काही भागांत अतिवृष्टी तर काही भागांत अत्यल्प पाऊस पडल्यामुळे १ जूनपासून आतापर्यंत १८३२ गावांतील तब्बल ४ लाख ६२ हजार ६४२ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. येत्या काही दिवसांत हा आकडा ५ लाख हेक्टरच्या पुढे जाण्याची शक्यता आहे.

--------

### मराठ्यांच्या डोक्यावर गुलाल

खाली मान घालावी लागेल, असे वागू नका. मी समाजासाठी मैदानात आलो आहे, तुम्हाला तुमची जबाबदारी पार पाडायची आहे. आपल्याला आपल्या लेकरा-बाळांना मोठे करायचे आहे. माझा शब्द खाली पडू देऊ नका, असे आवाहनही यावेळी केले. यावेळी आझाद मैदानावरील उपोषणस्थळी मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते श्री गणेशाची प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी गणेश आरती करुन मनोज जरागें पाटील यांनी त्यांच्या बेमुदत उपोषणास सुरुवात केली. मनोज जरांगे यांच्या आवाहनानुसार त्यांच्या आझाद मैदानावरील आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी राज्यभरातून लाखो मराठा आंदोलक मुंबईत दाखल झाले. मात्र प्रत्यक्षात आझाद मैदानावर ६ ते ७ हजार लोकांना बसण्याची जागा असल्याने बाकी आंदोलकांनी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस तसेच मुंबई महापालिके बाहेरील चौकात ठिय्या मांडला. त्यानंतर हुतात्मा चौक, गेट वे ऑफ इंडिया, चर्चगेट, मंत्रालय, मरीन ड्राईव्ह परिसरात हे आंदोलक मोठ्या जमावाने फिरत राहिले. तर मंत्रालय, हुतात्मा चौकात या आंदोलकांनी रास्ता रोको करण्याचा प्रयत्न केला. परंतु पोलिसांनी समजावल्यानंतर या आंदोलकांनी आपले रास्ता रोको आंदोलन मागे घेतल्याचे चित्र अनेक ठिकाणी पाह्यला मिळाले.

--------

### खताचे १२ नुमूने निकृष्ट

सुरू असून, या हंगामात कोरडवाहू असो की, बागायत प्रत्येक शेतकरी पेरणी करतो यामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणावर बियाणे आणि खते खरेदी करतात. अनेक कंपन्या आकर्षक जाहिराती करून आपला माल शेतकऱ्यांच्या माथी मारतात. मात्र, अनेकदा हे बियाणे उगवत नाही किंवा खते भेसळयुक्त निघतात, त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होते. हे प्रकार रोखण्यासाठी कृषी विभागाच्या गुणनियंत्रण कक्षाने मागील तीन महिन्यांपासून नमुने गोळा करून प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले होते. कृषी विभागाच्या अहवालानुसार, बियाण्यांचे ३९४ नमुने तपासले असता त्यापैकी २१ नमुने अप्रमाणित आढळले. यातील ७ प्रकरणे न्यायालयात खटला दाखल करण्यास पात्र ठरली आहेत. खतांचे २०८ नमुने तपासले असता १२ नमुने निकृष्ट आढळले, त्यापैकी ९ कंपन्यांवर कोर्टात खटला दाखल केला जाणार आहे. हा प्रकार गुणनियंत्रण विभागामुळे उघडकीस आला.

--------

### आरक्षण नाही हा तर सरकार

सर्वपक्षीय आमदार, खासदारांनी केले आहे. पुढील भूमिका ठरविण्यासाठी आम्ही शनिवारी (दि. ३०) पुण्यात बैठक घेणार आहोत. त्यानंतर पुढील दिशा स्पष्ट करू. आम्ही ओबीसी जोडो अभियान सुरु करणार आहोत. मंत्रिमंडळातील ओबीसी मंत्र्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घ्यावी, जर ओबीसी आरक्षणाला धक्का लागला तर या मंत्र्यांना ओबीसी समाज माफ करणार नाही, असा इशारा हाके यांनी दिला आहे.

----------

### जिल्हाधिकारी कार्यालयात अंगावर

सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयातच अंगावर डिझेल ओतून घेत आत्मदहनाचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या समोर कुटूंबासह उपोषणाला बसूनही प्रशासन कसलीच दखल घेत नसल्याने संतप्त झालेल्या रामहरी वायबसे हे आज सकाळी हातात डिझेलचे कॅन्ड घेऊन उपोषण स्थळापासून थेट जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयापर्यंत धावत सुटले. मला न्याय द्या, जगुन काही उपयोग नाही असे म्हणत ते थेट जिल्हाधिकारी कार्यालयात घुसले आणि मुख्य प्रवेश द्वारावरच त्यांनी कॅन्ड मधील डिझेल अंगावर ओतून घेत आत्मदहनाचा प्रयत्न केला. त्याचवेळी त्याठिकाणी उपस्थित पोलीसांनी त्यांना रोखल्याने पुढील अनर्थ टळला. पतीने डिझेल ओतून घेतल्याचे पाहुन पत्नीने एकच हंबरडा फोडला. यावेळी महिला पोलीसांनी त्यांनाही धीर दिला. दरम्यान या घटनेने जिल्हाधिकारी कार्यालयात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे उपोषण स्थळापासून ते जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मेन गेटपर्यंत वायबसे डिझेलचे कॅन्ड हातात घेऊन धावत सुटले होते. मात्र एवढे होईपर्यंत तेथील पोलीस कर्मचारी आणि महसुलचे कर्मचारी झोपा काढत होते का ? असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे.२४ तासात केंव्हाही आत्मदहन करणार असा इशारा त्यांनी दिला होता. मग त्यांना रोखले का नाही ? त्यांचे काही बरेवाईट झाले असते तर त्याला जबाबदार कोण होते ? असे प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

------------

### देवबाप्पा समुद्राच्या भेटीला

परिस्थिती तुमच्या काळासारखे राहिली नाही परिस्थिती फार बदलली आहे माहिती आणि तंत्रज्ञानाच्या या युगात देवबाप्पा तुमच्याही नकला केले जातात तुमचे वेगवेगळे व्हिडिओ बनवले जातात तुम्हाला आम्ही चित्रपटातच बोलताना पाहिलं पण आता तुमचेच फक्त माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ये आय सारख्या नवीन सिस्टीमचा उपयोग करत तुम्हाला बोलते करत आहेत असो असो विषय आहे गरीब मराठ्यांचा त्यासाठी मराठ्यांचा हा जनसागर आपल्या लेकरा बाळाच्या भविष्यासाठी मुंबईतील अरबी समुद्राला भेटायला आला आहे त्याची दखल तुम्ही घ्यावी या सरकारला बुद्धी द्यावी कशातून द्यायचे तो तुमचा आणि त्यांचा प्रश्न आहे पण एकदाचे आरक्षण दिले पाहिजे नाहीतर हा भक्त तुम्हाला माफ करणार नाही मराठवाड्यातल्या अंतरवाली मधून निघालेली ही यात्रा आपल्याच पुण्यनगरी मधून मुंबईत धडकली आहे एवढा जनसमुदाय कधीच कुण्या एका नेत्याच्या पाठीमागे आजपर्यंत दिसला नाही देवबाप्पा कदाचित तुमचे आगमन आणि तुमच्या निरोपाच्या कार्यक्रमाला देखील जेवढी गर्दी नसेल त्यापेक्षा अधिक ची गर्दी या ठिकाणी दिसत आहे तेव्हा किमान गर्दी आणि त्यातील व्यक्तींच्या भावना तुम्ही सरकारपर्यंत पोहोच करा आणि सांगा अरे बाबा या गरिबांना त्यांच्या मुलाबाळांच्या भविष्यासाठी आरक्षण द्या आणि आता हे तुम्हीच करू शकतात अशी भक्तांची भावना आहे सरकार मधले तुमचेही भक्त आहेत परंतु कोणताही नेता ठोस भूमिका घेताना दिसत नाही प्रत्येकाला भीती आहे आरक्षण दिले तर इतर समाज आपल्या अंगावर येईल का त्याचा परिणाम मतावर होईल का केवळ खुर्चीचा विचार न करता जनतेच्या भावनांचाही विचार केला पाहिजे नाहीतर जनता माफ करणार नाही आपल्या मूषकराज यांच्या माध्यमातून सरकारकडे निरोप पाठवला तरी सरकार ऐकून घेईल आणि निर्णय घेईल आता तुमच्यावरच आमचा विश्वास असल्याने ज्या भावनेने आम्ही तुमची मनोभावे पूजा आराधना करतो किमान त्याचे फळ आणि बक्षीस म्हणून या सागराला न्याय द्यावा एवढीच तुर्त अपेक्षा गणेश भक्त म्हणून करत आहेत.

---------------

cmyk

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. ३० ऑगस्ट २०२५



## थोडक्यात...

### एसटीचे वाहतुक निरीक्षक बबन गायकवाड यांचा सेवापुर्ती सोहळा

कडा । प्रतिनिधी



कडा येथील राज्य परिवहन महामंडळाचे सहायक वाहतुक निरीक्षक बबन गायकवाड यांच्या नियतवयोमानानुसार रविवार दि.३१ ऑगस्ट रोजी सकाळी येथील प्रविण मंगल कार्यालयात त्यांच्या सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

आष्टी येथील राज्य परिवहन महामंडळाच्या आगारात सहायक वाहतूक निरीक्षक म्हणून कार्यरत असलेले बबन गायकवाड यांच्या सेवापूर्ती सोहळ्यानिमित्त या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार सुरेश धस असणार आहेत तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार भीमराव धोंडे, साहेबराव दरेकर बाळासाहेब आजबे यांच्यासह एसटी महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी, ग्रामपंचायत पदाधिकारी, ग्राप सदस्य, मित्रपरिवार नातलग आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

### शहाजी ठोंबरे यांचे निधन

दिंद्रुड । प्रतिनिधी



वै.शहाजी श्रीरंग ठोंबरे (वय ८० वर्ष) यांचे शुक्रवारी सकाळी वार्धक्याने दिंद्रुड येथील राहत्या घरी निधन झाले.शेतात त्यांच्या मृतदेहावर अंत्यविधी दुपारी १२ वाजता करण्यात आले. पश्चात दोन मुले-सुना, दोन विवाहित मुली, नातवंडे असा परिवार आहे. उद्योजक रामेश्वर व लक्ष्मण शहाजी ठोंबरे यांचे ते वडील होत.

### ३१ ऑगस्ट रोजी 'भटके विमुक्त दिवस' म्हणून साजरा करावा

बीड । प्रतिनिधी इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत शासन निर्णयान्वये ३१ ऑगस्ट हा दिवस राज्यात 'भटके विमुक्त दिवस' म्हणुन साजरा करणे व त्यादिवशी विविध उपक्रम राबविणेबाबत शासनाने निर्देशित केलेले आहे. त्याअनुषंगाने ३१ ऑगस्ट हा 'दिवस भटके विमुक्त दिवस' जिल्हास्तरावर साजरा करण्यात येणार आहे. दि.३१ ऑगस्ट, २०२५ रोजी इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, बीड यांच्यामार्फत भटक्या विमुक्त संस्कृतीचे जिवनमुल्य, परिसंवाद शासकीय योजनांची माहीती, आरोग्य शिबीर, जात वैधता प्रमाणपत्र वाटप, प्रेरणादायी व्यक्तींचे सत्कार इत्यादी कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत.

### इतर मागासवर्गातील विद्यार्थ्यांना वसतीगृहासाठी प्रवेश प्रक्रिया सुरु

बीड । प्रतिनिधी

शैक्षणिक सन २०२५-२६ करिता इतर मागासवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जाती व विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुला/मुलींसाठी शासकीय वसतीगृहामध्ये प्रवेशासाठी अर्ज प्रक्रीया सुरु झाली आहे, त्यानुसार इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या मुला-मुलींच्या वसतीगृहामध्ये प्रवेश घेता येणार आहे. तसेच ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना व पंडीत दिनदयाळ उपाध्याय स्वयंम योजनेअंतर्गत १२ वी नंतर च्या व्यावसाईक अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या विध्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे.

### ३१ ऑगस्ट रोजी 'भटके विमुक्त दिवस' म्हणून साजरा करावा

बीड : इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत शासन निर्णयान्वये ३१ ऑगस्ट हा दिवस राज्यात 'भटके विमुक्त दिवस' म्हणुन साजरा करणे व त्यादिवशी विविध उपक्रम राबविणेबाबत शासनाने निर्देशित केलेले आहे. त्याअनुषंगाने ३१ ऑगस्ट हा 'दिवस भटके विमुक्त दिवस' जिल्हास्तरावर साजरा करण्यात येणार आहे. दि.३१ ऑगस्ट, २०२५ रोजी इतर मागास बहुजन कल्याण कार्यालय, बीड यांच्यामार्फत भटक्या विमुक्त संस्कृतीचे जिवनमुल्य, परिसंवाद शासकीय योजनांची माहीती, आरोग्य शिबीर, जात वैधता प्रमाणपत्र वाटप, प्रेरणादायी व्यक्तींचे सत्कार इत्यादी कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत.

# पावसात पिकांची व मालमत्तेची काळजी घ्या

## प्रशासन सदैव शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे -तहसीलदार चंद्रकांत शेळके

**बीड । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यात सध्या सतत कोसळणारा पाऊस , त्यातून उभ्या शेतपिकांचे होणारे नुकसान आणि त्यामध्ये चिंतेत सापडलेला शेतकरी . अशीच परिस्थिती अंथरवन पिंपरी तांड्यासह अनेक भागात पाहायला मिळत आहे . शुक्रवार , २९ ऑगस्ट रोजी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके , गटविकास अधिकारी अशोक राठोड आणि तालुका कृषी अधिकारी अशोक साळी यांनी या गावाला भेट देऊन शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला.**



जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे नैसर्गिक आपत्तीच्या बाबतीत अत्यन्त संवेदनशील आहेत . शेतकरी आत्महत्या असो अथवा शेतकऱ्यांच्या शेतातील नुकसान असो , त्यावर तात्काळ कार्यवाही झाली पाहिजे मदत मिळाली पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असतो . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक तसेच अंबाजोगाईच्या अपर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे - सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील सर्व तालुक्यांत प्रशासन सतर्क आहे . पावसाने झालेल्या नुकसानीची पाहणी करून शेतकऱ्यांना पिके वाचवण्यासाठी लागणाऱ्या उपाययोजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन थेट संवाद साधला . त्यांनी दिलेल्या आश्वासनामुळे गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर एक दिलासा उमटला . गावातील शेतकरी व नागरिकांनी प्रशासनाकडून दाखवलेल्या संवेदनशीलतेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली . पिचलेला पण न डगमगणारा बळीराजा : दरवर्षी वेगवेगळ्या रूपाने येणाऱ्या नैसर्गिक आपत्ती दुष्काळ , गारपीट , अवकाळी पाऊस यांनी बळीराजा अक्षरशः पिचला आहे . कर्जाचा डोंगर , पिकांवरचा खर्च आणि त्यातूनही पावसाचे खेळखंडोबामुळे त्याची स्वप्ने वारंवार चुरगळली जातात . तरीसुद्धा तो नव्याने धीर धरतो , पुन्हा उभा राहतो आणि नव्या पेरणीसह आशेची पालवी रुजवतो . "पाऊस कधी द्रोही तर कधी जीवनदाता, कधी आशा तर कधी निराशेचा झरा, तरीही बळीराजा लढतो अखंड कारण मातीतूनच त्याला उगम मिळतो नवा. " प्रशासनाचा तत्पर प्रतिसाद आशेचा किरण : अशा परिस्थितीत तहसीलदार , तालुका कृषी अधिकारी व गटविकास अधिकारी हे तत्परतेने शेतकऱ्यांच्या दारी पोहोचतात , त्यांच्या व्यथा ऐकून घेतात , उपाययोजना सुचवतात , ही बाब निश्चितच उल्लेखनीय आहे . शासन व प्रशासनाचे हे पाऊल बळीराजाला केवळ मार्गदर्शनच देत नाही तर मानसिक धीरही देते.यावेळी म्हाळसजवळाच्या मंडळ अधिकारी वंदना विघ्ने, ग्राम महसूल अधिकारी अक्षय डोफे , सामाजिक कार्यकर्ते दिनेश पवार तसेच बाळासाहेब राठोड , रामभाऊ पवार , सुरेश राठोड, सुनील राठोड , रमेश राठोड , विकास राठोड यांच्यासह गावातील अनेक शेतकरी उपस्थित होते .शेतकरी , प्रशासन आणि समाज या तिघांचे नाते परस्परावलंबी आहे . पावसाच्या संकटात अडकलेल्या शेतकऱ्याला फक्त आर्थिक मदतच नव्हे तर मानसिक आधार , वेळेवर सल्ला आणि साथ हवी असते . प्रशासनाने दाखवलेली संवेदनशीलता आणि शेतकऱ्यांनी दाखवलेला चिकाटीचा आत्मविश्वास या दोन्हींचा संगम झाला तरच खरी शाश्वत शेती उभी राहू शकेल. या निमित्ताने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी प्रशांत वाघमारे यांनीही नागरिकांना आवाहन केले की , " नदीकाठ, नाल्यालगत किंवा धोकादायक ठिकाणी जाऊ नये . हवामान खात्याच्या सूचना लक्षात घेऊन सुरक्षिततेची खबरदारी घ्यावी . प्रशासन सदैव सज्ज आहे , मात्र नागरिकांनीही स्वतःच्या सुरक्षेला प्राधान्य द्यावे.

### जिल्ह्यात सरासरी ४७० मि.मी.पाऊस

**बीड जिल्ह्यात सरासरी ४७० मि.मी. पाऊस आतापर्यंत नोंदवला गेला असून तो हंगामाच्या ८३ टक्के इतका आहे . मागील वर्षी याच काळात ५५१ मि.मी. पावसाची नोंद झाली होती . केवळ मागील २४ तासांत शिरूर कासार येथे सर्वाधिक ८९ मि.मी. , अंबाजोगाईत ६५ मि.मी. , केजमध्ये ७१ मि.मी. , धारूरमध्ये ८३ मि.मी. आणि राजुरी , पाटोदा , आष्टी , गेवराई , माजलगाव , परळी आदी भागांत मुसळधार पावसाची नोंद झाली आहे . काही मंडळांमध्ये १०० मि.मी. पेक्षा जास्त पाऊसही झाल्याने अतिवृष्टीची नोंद घेण्यात आली आहे . ही माहिती बीड जिल्ह्याचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी दिली**

### माजलगाव धरणाचे शेतकऱ्यांनी केले जलपुजन

माजलगाव । प्रतिनिधी

बिड जिल्ह्यातील माजलगाव धरण ९४% क्षमतेने भरले असून पाण्याचा प्रश्न मिटला आहे तसेच माजलगाव तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी मिळण्याचा मार्ग मोकळा झाल्याने शेतकऱ्यांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून शेतकरी नेते भाई अॅड नारायण गोले पाटील यांच्यासह शेतकऱ्यांकडून माजलगाव धरणाच्या पाण्याचे जलपूजन करण्यात आले,या वेळी शेतकरी बांधवांनी एकमेकांना पेढे भरवुन केला आनंद सजरा.. माजलगाव धरणात येणाऱ्या पाण्याचा विसर्ग खूप मोठा असल्याने रात्री माजलगाव धरणाच्या पाण्याचा विसर्ग सिंदफणा नदीपात्रात सोडण्यात येणार आहे.



## अद्यावत संकेतस्थळावर विविध सुविधा उपलब्ध नागरिकांना आता घरबसल्या तक्रार करता येणार

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा पोलीस दलाच्या वतीने पोलीस अधीक्षकांच्या संकल्पनेतून नागरिकांच्या सेवेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून अद्यावत संकेतस्थळ तयार करण्यात आले असून नागरिकांना सेवांचा लाभ सुलभ, पारदर्शक आणि तत्परतेने मिळावा यासाठी हे संकेतस्थळ अद्यावत करण्यात आले आहे आता या संकेतस्थळावर नागरिकांना घरबसल्या तक्रारी करता येणार आहेत.

बीड जिल्हा पोलीस दलाच्या वतीने संवाद कोडवर नागरिकांना एका क्लिकवर पोलीस अधीक्षकांना तक्रार करता येईल. आपल्या तक्रारीच्या निपटाऱ्यासाठी २४ तासाच्या आत नागरिकांना संपर्क करून त्याचे निरसन करता येईल. याच संकेतस्थळावर वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे संपर्क क्रमांक देण्यात येतील याद्वारे वरिष्ठांना संपर्क करता येईल. सर्व पोलीस ठाण्याचे प्रभारी त्यांचे नाव ,त्यांचा संपर्क क्रमांक, आपल्या जवळचे पोलीस ठाणे, पोलीस ठाण्याचे लोकेशन आदी बाबी या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. नागरिकांच्या तक्रारीसाठी नागरिकांना घरबसल्या ऑनलाईन तक्रारी देता येतील. यासाठी ऑनलाईन तक्रार नोंदणी, सायबर तक्रार नोंदणी, मोबाईल हरवल्याची, चोरी गेल्याची तक्रार आदी सेवा उपलब्ध झाल्या आहेत. नागरिकांना भाडेकरूंची माहिती, हरवले सापडल्याची माहिती, अपघात भरपाईसाठी अर्ज प्रक्रिया, पारपत्र स्थिती आदी माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच नागरिकांसाठी उपयुक्त संकेतस्थळे, माहितीचा अधिकार ,महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम आदी माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे ... या बीड पोलिसांच्या अधिकृत संकेतस्थळाच्या माध्यमातून नागरिकांना त्यांच्या दैनंदिन गरजांसाठी लागणाऱ्या पोलीस सेवांची माहिती या संकेतस्थळावर उपलब्ध झालेली आहे. या सर्व माहितीमुळे आता नागरिकांना तक्रार देणे अधिक सोपे झाले असून जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क करणे ही सोयीस्कर झाले आहे.

## पान ६ वरुन...

### बीड-निरगुडी-पिंपळवंडी

राज्य मार्ग कमी अंतराचा व वेळेची ही बचत करणार असल्याने या मार्गावरून सतत रात्रं-दिवसभर (२४ तास) सर्व प्रकारच्या वाहनांची वर्दळ पहावयास मिळत आहे.सतत वाहनांची या मार्गावरून वर्दळ असल्याने मागील काही दिवसापासून होत असलेल्या पावसाने या प्रमुख व महत्त्वाच्या राज्य मार्गाची अक्षरशा चाळणी झालेली आहे.सार्वजनिक बांधकाम विभाग व संबंधित अभियंत्याने याकडे लक्ष देऊन लवकरात लवकर या मार्गावरील खड्डे डांबर किंवा सिमेंट कॉंक्रीटने भरून रस्ता वाहनधारकांसाठी,प्रवाशांचा प्रवास आरामदायी व्हावा असा बनवावा अशी मागणी प्रवाशी वाहनधारकांकडून होत आहे.या मार्गावर अनेक ठिकाणी धोकेदायक वेडीवाकडी वळणे आहेत.ती वळणे काढून रस्ता सरळ करावा,म्हणजे वळणामुळे होणारे अपघात टळतील. तसेच या मार्गावरील गावे,शहरांची अंतरे दाखवणारे फलक,स्टोन कि.मी. दर्शक फलक नाहीत ते लावावेत. डोंगरकिन्ही,पिंपळवंडी,अंमळनेर, डोईठाण,धामणगाव या बाजारपेठेच्या व प्रवासी ग्रामस्थ असलेल्या वर्दळीच्या गावाच्या ठिकाणी रस्त्यावर "गतिरोधक" बनवावेत म्हणजे भविष्यात गतिरोधक अभावी होणारे अपघात टळतील.रस्त्याच्या दोन्ही बाजूने असणाऱ्या पंख्यावर अनेक ठिकाणी लहान-मोठी झाडे-झुडपे उगवलेले आहेत.त्यामुळे अनेक वेळा पुढील रस्त्याचा अंदाज येत नाही.समोरून आलेली वाहने दिसत नाहीत.त्यामुळे अपघाताचाधोका होऊ शकतो.त्या झाडाझुडपांची विल्हेवाट लावून रस्ता मार्ग खुला करावा अशी मागणी जोर धरत आहे. आ.सुरेश धस यांनी मतदारसंघातील रस्त्यांच्या समस्येबाबत केंद्रीय मंत्री नितीन गडकरींची मागील आठवड्यात दिल्लीत भेट घेऊन मतदार संघातील विविध रस्ते व महामार्गाबाबत समस्या मांडून रस्त्याच्या प्रलंबित समस्या तातडीने मार्गी लावाव्यात यासाठी पाठपुरावा करत आहेत.त्याप्रमाणे आ.धस यांच्या पुढाकारातून बीड, निरगुडी,डोंगरकिन्ही,पिंपळवंडी, अंमळनेर,अहिल्यानगर राज्य महामार्गाची समस्या निश्चित दूर होईल यात तिळमात्र शंका नाही.या रस्त्याबाबत त्यांनी अनेक वेळा पाठपुरावा करून रस्ता दर्जेदार होण्यासाठी त्यांची सतत तळमळ आहे.त्यांच्यामुळे या रस्त्याची समस्या "धसास" लागणार अशी सामान्य जनता व प्रवाशी वर्गातून अपेक्षा व्यक्त केली जात आहे. लिंबादेवी,निरगुडी,डोंगरकिन्ही, पिंपळवंडी,अंमळनेर, डोईठाण,धामणगाव,दौलावडगाव, अहिल्यानगर या प्रमुख राज्य मार्गाला राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा मिळवण्यासाठी खा.बजरंग बप्पा सोनवणे यांनी केंद्रीय वाहतूक मंत्री नितिन गडकरी यांना निवेदन देऊन हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग करावा अशी मागणी करून यासाठी खा.सोनवणे सतत पाठपुरावा करीत आहेत. त्यांच्या या मागणीची मंत्री गडकरी यांनी दखल घेतली असून लवकरच या रस्त्यास राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा देण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे गडकरी यांनी आश्वासन दिलेले आहे.

### म्हसोबावाडी येथील विद्यार्थी

पाठपुरावे करून देखील तालुका लोक प्रतिनिधी याकडे दुर्लक्ष करत आहेत..या ठिकाणी असणाऱ्या सर्व लोकवस्ती वरील लोकांची अशी अपेक्षा आहे की या गोष्टीकडे तात्काळ लक्ष द्यावे व ही समस्या सोडवावी या वस्ती वरील लोक व शेतकरी शंकर एकनाथ शेकडे,ब्रम्हदेव एकनाथ शेकडे,नामदेव देवराम शेकडे,गोरख एकनाथ बडे,विठ्ठल एकनाथ बडे,पोपट आश्रुबा शेकडे,सुभाष आश्रूबा शेकडे,रावसाहेब आश्रुबा शेकडे, शिवदास आश्रुबा शेकडे,संजय सुंदर शेकडे, राजु सुंदर शेकडे ,आजीनाथ भाऊराव शेकडे, सुदाम गहिनीनाथ शेकडे सह सर्व महिला व विद्यार्थी सह आमच्या दैनिकचे प्रतिनिधी -प्रेम पवळ उपस्थित होते.

### हरवलेली दोन भावंडे

आणि बाहेर टपरीवाल्यांना याची माहिती देऊन ही दोघे दोघेजण मुकी असल्याचे कळवले. तब्बल तीन तास शोधल्यानंतर ही दोन्ही मुले ओंकार बाळू शिंदे (वय पाच वर्ष) व महिमा बाळू शिंदे (वय सात वर्षे) पाटील गल्लीमध्ये दिसून आली. पोलिसांनी ही दोन्ही मुले आजीच्या स्वाधिन केली. दोन्ही मुले सुखरूप मिळाल्याने आजीने वडवणी पोलिसांचे आभार मानले.

### बीड शहरातील

सांस्कृतिक परंपरा, ऐतिहासिक, धार्मिक, आध्यात्मिक, शैक्षणिक, वैज्ञानिक आणि स्थानिक ग्रामीण व शहरी जीवनाशी संबंधित सामाजिक संदेश देणारे देखावे साकारणे अपेक्षित आहे. अशा देखाव्यांपैकी उत्कृष्ट मंडळास सन्मानित करण्यात येईल.

**अशी आहे निवड समिती**

उत्कृष्ट सार्वजनिक गणेश मंडळांच्या देखाव्यांची निवड करण्यासाठी निरीक्षण समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीमध्ये प्रा.लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, प्रा.संजय पाटील देवळाणकर, प्रा.सारंग वाघमारे, फामजी पारीख, विद्याभूषण बेदरकर यांचा समावेश आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या मंडळांनी नोंदणीसाठी श्रीमंत तोंडे ८३२९२५९२९५ व नागेश शेटे ७०५७०२६८७७ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### गौरी महालक्ष्मी सजावट

तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या तालुकाध्यक्षा सौ. मुक्तातार्ई आर्दड-मोटे यांनी केले आहे. गेवराई विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांनी गेवराई शहराच्या पारंपारीक लोककलेचा वारसा जपण्यासाठी टिपरे महोत्सवाचे भव्य आयोजन सन २०१९ पासून सुरु केले आहे. त्याला मिळणारा प्रचंड प्रतिसाद लक्षात घेऊन मागील दोन वर्षांपासून खास महिलांच्या आग्रही मागणीवरून भोलोबा (फेर) गीत स्पर्धा आणि गौरी महालक्ष्मी सजावट स्पर्धेचे आयोजन केले जात आहे.

## वैद्यनाथ बँकेच्या चेअरमनपदी विनोद सामत तर व्हाईस चेअरमनपदी रमेशराव कराड

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

महाराष्ट्रात नामांकित असलेल्या येथील दि वैद्यनाथ को-ऑपरेटिव्ह बँके लि.च्या चेअरमनपदी विनोद सामत तर व्हाईस चेअरमनपदी रमेशराव कराड यांची फेरनिवड करण्यात आली. मा. खा. तथा बँकेच्या संचालिका डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या उपस्थितीत खेळीमेळीच्या वातावरणात झालेल्या बैठकीत ही बिनविरोध निवड झाली. आगामी काळात पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यनाथ बँकेच्या चौफेर प्रगतीसाठी आपण प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याची ग्वाही नुतन चेअरमन विनोद सामत यांनी निवडीनंतर माध्यमांशी बोलताना दिली. दरम्यान चेअरमन व व्हाईस चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल विनोद सामत व रमेशराव कराड यांचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहेत.



वैद्यनाथ को-ऑपरेटिव्ह बँक लि.च्या संचालक मंडळाची निवडणूक दि. १० ऑगस्ट रोजी संपन्न झाली. यात ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखालील लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलचे चार उमेदवार बिनविरोध निवडून आले तर उर्वरित १३ जागांवर सर्व उमेदवार विक्रमी मताधिक्य घेऊन विजयी झाले. नवनिर्वाचित संचालक मंडळाची आज बँकेच्या परळी वैजनाथ येथील मुख्य शाखेच्या सभागृहात निवडणूक निर्णय अधिकारी समृत जाधव यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. यात चेअरमन पदासाठी संचालक अनिल तांदळे यांनी विद्यमान चेअरमन विनोद सामत यांचे नाव सुचविले त्यास संचालक विजयकुमार वाकेकर यांनी अनुमोदन दिले. व्हाईस चेअरमन पदासाठी संचालक संदीप लाहोटी यांनी रमेशराव कराड यांचे नाव सुचविले आणि संचालक राजेंद्र लोमटे यांनी अनुमोदन दिले. चेअरमन आणि व्हाईस चेअरमन पदासाठी प्रत्येकी एकच अर्ज आल्याने दोघांचीही बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी समृत जाधव यांनी जाहीर केले. यावेळी सहाय्यक निवडणूक अधिकारी कदम, कातळे, सहाय्यक निबंधक कार्यालयाचे अधीक्षक जाधव, ठोसर यांनी सहकार्य केले.

## जयभवानी महाविद्यालयात डॉ.काकडे यांचे व्याख्यान

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालय राष्ट्रीय शिवाय योजना विभाग आणि बीड जिल्हा एड्स नियंत्रण प्रतिबंध नियंत्रण कक्षाच्या वतीने राष्ट्रीय युवा दिना निमित्त एड्स जनजागृती अभियानांतर्गत समाजातील समाज व गैरसमज या विषयावर प्राध्यापक डॉक्टर शिवाजीराव काकडे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे समन्वयक गोरे मॅडम प्राध्यापक नारायण फुने प्रा पापाजी चव्हाण कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य सोमनाथ घाडगे उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रस्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉक्टर लोखंडे यांनी केले या कार्यक्रमात गोरे मॅडम प्राध्यापक शिवाजीराव काकडे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना अलीकडच्या काळात उदयास आलेल्या एड्स रोगामुळे समाजात अनेक प्रकारचे समज गैर समाज आहेत याबाबत विद्यार्थ्यांनी जनजागृती करावी चांगल्या समाजाच्या स्वास्थ्यासाठी या चळवळीत सहभागी होण्याची आव्हान डॉक्टर काकडे यांनी केले या कार्यक्रमाचे आभार प्राध्यापक ग्रंथपाल ज्योती रकटे मॅडम यांनी मानले कार्यक्रम सहकार्य करण्यासाठी यश जनजागृती साठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले वकृत्व स्पर्धा निबंध स्पर्धा रांगोळी स्पर्धा आयोजन केले या स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले प्राध्यापक पापा चव्हाण प्राध्यापक नारायण फुने यांनी सहकार्य केले.

# गुणवत्तेत सुसज्ज इंग्रजी शाळेलाही लाजवेल अशी झेडपीची सवासेवाडी शाळा

**वडवणी । प्रतिनिधी**

**वडवणी तालुक्याचे कार्यतत्पर गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी दि.२६ मंगळवार रोजी तालुक्यातील चिंचवन केंद्रातील डोंगरदऱ्यात वसलेल्या व अतिशय दुर्गम भागात असलेल्या सवासेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस भेट देवून निपुण महाराष्ट्र अंतर्गत शाळेची व शाळेतील गुणवत्तेची तपासणी केली. गुणवत्तेत एखाद्या शहरातील सुसज्ज अशा इंग्रजी शाळेलाही लाजवेल अशी या दुर्गम भागातील झेडपीच्या शाळेची गुणवत्ता पाहून तपासणीअंती गटशिक्षणाधिकारी उजगरे यांनी कौतुक व समाधान व्यक्त करुन येथील दोन्ही शिक्षकांच्या पाठी कौतुकाची थाप दिली.**



वडवणी तालुक्यातील सर्व शाळांमध्ये निपुण महाराष्ट्र अंतर्गत नुकतीच पायाभूत चाचणी घेण्यात आली. त्या पायाभूत चाचणीचे पुर्नमूल्यांकनासाठी वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष तथा कार्यतत्पर गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी दि.२६ ऑगस्ट २०२५ मंगळवार रोजी दुपारी अचानक वडवणी तालुक्यातील चिंचवन केंद्राअंतर्गत येणाऱ्या सवासेवाडी शाळेला अचानक भेट दिली. या भेटीच्या वेळी शाळेतील सर्व विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित दिसून आले. या भेटीच्या वेळी साहेबांनी शाळेतील इयत्ता पहिली ते चौथी वर्गातील सर्व विद्यार्थ्यांची वैयक्तिक मराठी, इंग्रजी व गणित विषयांची स्तरनिहाय वस्तुनिष्ठ तपासणी केली. ही सर्व तपासणी ऑनलाईन ऍपच्या माध्यमातून करण्यात आली. या तपासणीमध्ये गटशिक्षणाधिकारी यांना शाळेची गुणवत्ता १०० टक्के प्रगत दिसून आली. १०० टक्के विद्यार्थी ही वाचन, लेखन करतांना दिसून आली. डोंगरदऱ्यात वसलेल्या, अतिशय दुर्गम भागात असलेल्या व शाळेला जाण्यासाठी रस्ताही नसलेल्या या अशा अत्यंत बिकट भौगोलिक परिस्थितीमध्येही एखाद्या शहरातील सुसज्ज अशा इंग्रजी शाळेलाही लाजवेल अशी गुणवत्ता याठिकाणी आढळून आली. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी अपेक्षित क्षमता प्राप्त केले असल्याचे पाहून साहेबांनी समाधान व्यक्त केले. शाळेच्या प्रगतीसाठी शाळेतील शिक्षक आणि विद्यार्थी यांना वेळोवेळी मार्गदर्शन करणारे चिंचवन केंद्राचे केंद्रप्रमुख सुनिल मुंडे यांचेही साहेबांनी अभिनंदन केले तसेच मागील वर्षी विविध स्पर्धा परीक्षेत राज्यस्तरावर, जिल्हास्तरावर, तालुकास्तरावर प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचाही सत्कार करुन अभिनंदन केले आणि पुढील स्पर्धा परीक्षेबाबत मार्गदर्शन देखील केले. शाळेतील शिक्षकांनाही त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कार्याबध्दल शाबासकी दिली. याप्रसंगी त्यांच्यासोबत वडवणी कन्या केंद्राचे केंद्रप्रमुख सैलानी शेख, वडवणीचे केंद्रप्रमुख सुरेश करांडे, चिंचवन केंद्राचे केंद्रप्रमुख सुनिल मुंडे हेही उपस्थित होते. तसेच वडवणी तालुक्यातील आदर्श शाळा सोन्नाखोटा शाळेचे मुख्याध्यापक आश्रुबा मुंडे व सहशिक्षक चिकाळकर सर व गहिनीनाथनगर शाळेचे मुख्याध्यापक खाडे सर हेही याप्रसंगी उपस्थित होते.

cmyk

# साखर कारखान्यांचा कर्जाचा हप्ता थकला तर मोठी कारवाई

## सरकारचा नवा निर्णय कारखानदारांना अडचणीचा ठरणार ?

कोल्हापूर : राष्ट्रीय सहकार विकास निगम (एनसीडीसी) कडून घेतलेले कर्ज राज्यातील साखर कारखान्यांच्या डोक्यावर टांगती तलवार आहे. या कर्जाचा हप्ता थकला तर थेट कारखान्यांचे संचालक मंडळ बरखास्त करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. या कारवाईचा राजकीय हत्यार म्हणून वापर होण्याची शक्यता अधिक असल्याने साखर कारखानदारांमध्ये भीती आहे. राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना एनसीडीसीच्या माध्यमातून खेळत्या भांडवलासाठी वर्षाला कोट्यवधी रुपयांचे कर्ज उपलब्ध करून दिले जाते.

विशेष म्हणजे इतर वित्तीय संस्थांपेक्षा कर्जाला कमी व्याजदर असल्याने कारखान्यांना हेच कर्ज हवे असते. या कर्जाला राज्य सरकारची थकहमी असते. मध्यंतरी साखर कारखान्यांना दिलेले चार हजार कोटींचे कर्ज थकल्याने राज्य सहकारी बँकेने सरकारकडे पैशासाठी तगादा लावला होता. न्यायालयीन फेऱ्या झाल्यानंतर २६०० कोटींवर



तडजोड करून सरकारने ते पैसे टप्प्याटप्प्याने राज्य बँकेला देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे, मध्यंतरी सरकारने थकहमी देण्याचे बंद केले होते. परिणामी कारखाने अडचणीत आलेच त्याचबरोबर राजकीय ताकद वाढवण्यासाठी विद्यमान सरकारने थकहमी देण्यास सुरुवात केली. राज्यातील कारखान्यांना २०२४-२५ या हंगामासाठी ७६१७ कोटींचे कर्ज एनसीडीसीने सरकारच्या थकहमीवर कर्ज दिले आहे. हा आकडा मोठा असून उसाचा दर देण्याची स्पर्धा पाहता, या कर्जाची परतफेड करताना कारखान्यांची दमछाक होणार आहे. एनसीसीडीने मागील हंगामात दिलेले ७६१७ कोटींचे कर्जापैकी ५० टक्के जरी थकले तर ते देण्याची ताकद सध्यातरी राज्य सरकारकडे नाही.

त्यामुळे सरकारने कारवाईचे धोरण घेतले असले तरी आगामी काळात राजकीय हत्यार म्हणून याचा वापर होऊ शकतो. राज्यातील बहुतांशी साखर कारखानदार भाजप, शिंदेसेना, राष्ट्रवादी काँग्रेस व त्यांच्या मित्रपक्षांचे आहेत. याच कारखान्यांना थकहमी दिली आहे. हे कर्ज थकले तर सत्तेतील साखर कारखानदारांवर राज्य सरकार कारवाई करणार का? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## गहू पिकाची लागवड करण्या अगोदर 'ही' महत्त्वाची माहिती लक्षात घ्या



रब्बी हंगामात गहू लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी या पिकाची पूर्वमशागत, सुधारित जाती, बीजप्रक्रिया आणि पेरणी पद्धती याविषयी महात्मा फुले कृषी विद्यापीठातील तज्ज्ञांनी महत्वपूर्ण सल्ला दिलेला आहे.

गहू पिकाचे लागवड पूर्व नियोजन : बागायती गहू पिकाचे नियोजन करणाऱ्या शेतकऱ्यांनी भारी व खोल जमीन निवडून पूर्व मशागत करावी. जमिनीचा उतार लक्षात घेऊन गव्हासाठी २.५ ते ४ मीटर रुंद व ७ ते २५ मीटर लांब आकाराचे सरे पाडावेत. जमिनीतील उपलब्ध ओलाव्यावर कोरडवाहू क्षेत्रातील गव्हाची पेरणी ३१ ऑक्टोबर पर्यंत पूर्ण करावी. संरक्षित पाणी उपलब्ध असल्यास पेरणी २५ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर दरम्यान करावी. संरक्षित पाण्याखालील गव्हासाठी हेक्टरी ७५ ते १०० किलो बियाणे पेरणीसाठी वापरावे. कोरडवाहू आणि मर्यादित सिंचनासाठी सुधारित जाती : सरबती जाती (जिरायती/कोरडवाहू) एन.आय.ए.डब्लू. १४१५ (नेत्रावती).सरबती जाती (मर्यादित सिंचन) एन.आय.ए.डब्लू. १९९४ (फुले समाधान), एन.आय.ए.डब्लू. ३६२४ (फुले अनुपम), एन.आय.ए.डब्लू. ३१७० (फुले सात्विक), एन.आय.ए.डब्लू. १४१५ (नेत्रावती). बन्सी जात (कोरडवाहू) - एम.ए.सी.एस.४०२८, एन.आय.डी.डब्लू.१९४९, एम.ए.सी.एस.४०५८.

तांबेरा प्रतिकारक वाण- ए.के .डी. डब्लू २९९७- १६ (शरद)

बीज प्रक्रिया आणि पेरणी : पेरणीपूवी बियाण्यास थायरम (७५% डब्लू. एस.) ३ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास प्रक्रिया करावी. बियाणे वाळवल्यानंतर प्रति किलो बियाण्यास २५ ग्रॅम अॅझोटोबॅक्टर आणि २५ ग्रॅम स्फुरद विरघळविणाऱ्या जीवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी. बीज प्रक्रियेमुळे उत्पादनात १० ते १५ टक्के वाढ होते. पेरणीच्या वेळी जमिनीत पुरेशी ओल असावी. पेरणी ५ ते ६ सेंमी खोल करावी. त्यामुळे उगवण चांगली होते. संरक्षित पाण्याखालील गव्हाची पेरणी दोन ओळीत २० सेंमी अंतर ठेवून करावी. पेरणी उभी आडवी अशी दोन्ही बाजूने न करता एकेरी करावी म्हणजे आंतरमशागत करता येते. बियाणे झाकण्यासाठी कुळव उलटा करून चालवावा म्हणजे बी व्यवस्थित दाबून झाकले जाते.

## बुरशीपासून करा तूर पिकाचे संरक्षण

राज्यातील बहुतांश भागात पाऊस सुरूच आहे. काही जमिनीत निचरा लवकर होतो तर भारी काळया जमिनीत पाण्याचा निचरा लवकर होत नाही. शिवाय सतत रिमझिम पावसामुळे जमीन ओली असते. अशा जमिनीत तूर पिकावर खोडावर मुळावर फायटोप्थोरो या हानिकारक बुरशीचा प्रादुर्भाव होत असतो. अशा वेळी शेतकऱ्यांनी त्वरित बुरशीनाशक आळवणी करावी.

उपाययोजना :मेटालक्झिल एक ग्रॅम एक लिटर पाण्यात (१०० लिटर पाण्यात १०० ग्रॅम) घेऊन द्रावण तयार करत पिकाच्या मुळाभोवती आळवणी करावी. बुंध्यावर देखील द्रावण पडेल याची काळजी घ्यावी. किंवा रेडोमिल अडीच ग्रॅम एक लिटर पाण्यात घेऊन आळवणी करावी (१०० लिटर पाण्यात २५० ग्रॅम) अथवा जैविक बुरशीनाशक म्हणून वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ निर्मित बायोमिक्स याचा एकरी चार लिटर या प्रमाणे उपयोग करावा. तीनशे लिटर पाण्यात ४ लिटर



बायोमिक्स हे बुरशीनाशक किडनाशक घेत पिकावर आळवणी करावी.

दुसरी बुरशीचे नियंत्रण :बुरशी म्हणजे मायक्रोफोमिना या हानीकारक बुरशीचा प्रदूभाव पुढील म्हणजे सप्टेंबर महिन्यात होत असतो. याची लक्षणे म्हणजे तूर पिकाच्या फांदीवर काळे चट्टे पडतात आणि नंतर पिक वाळून जाते. अशावेळी अगोदर साफ या बुरशी नाशकचा फवारणी करावी.

तिसरी बुरशीचे नियंत्रण :तिसरी जी बुरशी या पिकावर येते, ती पिकाला शेंगा आल्यानंतर येते. या बुरशीचे नाव फ्युजिरियम असे आहे. ही येण्याचे शास्त्रीय कारण म्हणजे जमिनीत ओलीचा अभाव असल्यावर येते, म्हणून पिकाला शेंगा लागतेवेळी जमिनीत ओलावा असणे गरजेचे असते. अशा प्रकारे शेतकऱ्यांनी तूर पिकाचे या तीन बुरशीपासून संरक्षण करावे.

## पशुखाद्य दरवाढीने दुग्ध व्यावसायिक संकटात



पशुखाद्यांचे दर दिवसेंदिवस वाढत असल्याने दुग्ध व्यवसाय धोक्यात आला आहे. विशेषतः सरकी ढेपेच्या दरवाढीचा पशुपालकांना मोठा फटका बसत असून, दुधाला मिळणारा भाव आणि पशुखाद्याचा खर्च याचा ताळमेळ राहत नाही, अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे दुग्ध व्यावसायिक सांगत आहेत. सध्या सरकी ढेप बाजारात ३५०० ते ४२०० रुपये क्विंटल दराने विकली जात आहे. नोव्हेंबर २०२४ मध्ये हा दर २५०० ते २७०० रुपयांच्या दरम्यान असल्याचे सांगण्यात आले. मात्र एप्रिल २०२५ पासून या दरात सातत्याने वाढ झाली असून, आतापर्यंत किमती खाली आलेल्या नाहीत.

यंदा देशभरात कपाशीची लागवड कमी झाल्याने तसेच असमतोल पावसामुळे उत्पादन घटण्याची भीती असल्याने सरकी व ढेपेच्या भावात आणखी वाढ होण्याचे संकेत आहेत. सध्या बाजारात विक्रीसाठी येणारी बहुतांश ढेप ही साठवलेलीच असल्याने भावावर नियंत्रण राहत नाही. दरवाढीमुळे पशुपालकांनी पर्यायी खाद्याकडे वळण्यास सुरुवात केली आहे. हरभरा, तूर, मका चुरीला वाढती मागणी असल्याने या खाद्यपदार्थांचे दरही झपाट्याने वाढले आहेत. दुसरीकडे दुधाच्या खरेदी दरात मात्र वाढ झालेली नाही. सध्या गाईच्या दुधाची खरेदी जास्तीत जास्त ३४ रुपये लिटर दराने होत आहे. पशुखाद्याचा खर्च आणि दुधाला मिळणारा भाव यात कुठेच ताळमेळ नसल्याने पशुपालक आर्थिकदृष्ट्या मोठ्या अडचणीत सापडले आहेत. सरकी ढेप, पशुखाद्य मुळात करमुक्त असून काही दलाल याची साठवणूक ठेवतात. सट्टा बाजारात दर खाली-वर केले जातात. आता गेले काही महिने दर वाढलेले असून यात पशुपालक भरडत आहे. यामुळे नवीन कुणीही या व्यवसायात यायला तयार नाही. जे वर्षानुवर्षे व्यवसाय करीत आहेत तेवढेच यात टिकून आहेत. सरकारने पशुखाद्य व्यवसायावर नियंत्रण आणण्याची गरज आहे.

## अधिक दुग्ध उत्पादनासाठी डांगी गाय ठरते फायदेशीर

शेतकरी बांधवांकडे त्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी अनेक प्रकारचे उत्तम प्राणी आहेत, ज्यामुळे त्यांना दर महिन्याला चांगले उत्पन्न मिळू शकते. तुम्ही पशुपालक असाल, पण तुमचा प्राणी तुम्हाला काही विशेष फायदा देत नसेल, तर घाबरू नका. आज आम्ही तुमच्यासाठी अशा प्राण्याची माहिती घेऊन आलो आहोत, ज्याचे पालन करून तुम्ही काही महिन्यांत श्रीमंत होऊ शकता. खरं तर, आपण ज्या प्राण्याबद्दल बोलत आहोत ते म्हणजे डांगी गाय, जी आजच्या काळात इतर प्राण्यांपेक्षा जास्त नफा कमावते. भारतीय बाजारपेठेतही त्याची मागणी सर्वाधिक आहे ही गाय मूळ जातीची डांगी आहे, जी गुजरातमधील डांग, महाराष्ट्रातील ठाणे, नाशिक, अहमदनगर आणि हरियाणातील कर्नाल आणि रोहतकमध्ये अधिक आढळते. ही गाय वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या नावांनी ओळखली जाते. उदाहरणार्थ, गुजरातमध्ये ही गाय डांग म्हणून ओळखली जाते. ही गाय इतर प्राण्यांच्या तुलनेत अधिक वेगाने काम करते, असे शेतकरी व पशुपालकांचे म्हणणे आहे.



याशिवाय ही गुरे अतिशय शांत आणि शक्तिशाली असतात.

डांगी गायीची क्षमता : देशी गायीची सरासरी दूध काढण्याची क्षमता एका बायंटमध्ये सुमारे ४३० लिटर दूध देते आणि दुसरीकडे डांगी गायीची काळजी घेतल्यास सुमारे ८०० लिटरपर्यंत दूध मिळू शकते. जर तुम्हाला ही गाय ओळखता येत नसेल तर घाबरू नका, यासाठी तुम्हाला काही गोष्टी लक्षात ठेवाव्या लागतील. डांगी गायीची सरासरी उंची ११३ सेमी असते आणि या जातीच्या बैलाची उंची ११७ सेमी पर्यंत असते. त्यांचा रंग पांढरा असून त्यांच्या शरीरावर लाल किंवा काळे डाग दिसतील. दुसरीकडे, जर आपण त्यांच्या शिंगांबद्दल बोललो, तर त्यांची शिंगे लहान आहेत, म्हणजे १२ ते १५ सेमी आणि टोकदार टोकांसह जाड. डांगी गाईची कातडी पाहिल्यास ती अतिशय चमकदार आणि मऊ असते. त्याच्या त्वचेवर भरपूर केस आहेत. त्यांचे कान आकाराने लहान असून ते आतून काळ्या रंगाचे असतात. सद्य परिस्थितीमध्ये शेतात गेल्यानंतर मुंगळ्याच्या आकाराचे कंदमाशीचे प्रौढ उडताना मोठ्या प्रमाणात दिसून येत असून, त्याकरिता वेळीच लक्ष देऊन खालील प्रमाणे व्यवस्थापनाच्या उपाययोजना कराव्यात.




### महत्वाच्या घटना

१५७४ : गुरू रामदास शिखांचे चौथे गुरू बनले.
१६५९ : मुघल शासक औरंगजेब यांनी आपला मोठा भाऊ दारा शिकोह यांना फाशी दिली.
१८३५ : ऑस्ट्रेलियातील मेलबर्न शहराची स्थापना झाली.
१८३५ : अमेरिकेतील ह्युस्टन शहराची स्थापना झाली.
१९२८ : पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय स्वातंत्र्य लीग ची स्थापन करण्यात आली.
१९४५ : दुसरे महायुद्ध ब्रिटिश सैन्याने हाँगकाँगची जपानच्या अधिपत्यातुन सुटका केली.
१९७९ : सुमारे दहा लाख हायड्रोजन बॉम्बच्या स्फोटांएवढी ऊर्जा निर्माण करुन 'हॉवर्ड-कुमेन-मायकेल्स' हा धूमकेतू सूर्याच्या पृष्ठबागावर आदळला. सूर्याच्या पृष्ठभागावर धूमकेतू आदळण्याची मानवी इतिहासातील ही पहिली नोंद आहे.
१९८४ : अमेरिकन अंतराळ यान डिस्कव्हरी ने पहिल्यांदा अवकाशात भरारी केली.
२००९ : भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) ने चंद्रयान-१ मोहीम ही औपचारिकरित्या समाप्त केली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५५९ : मुघल सम्राट अकबर यांचा मुलगा जहांगीर ४ यांचा जन्मदिन.
१५६९ : जहांगीर ४ था मुघल सम्राट (मृत्यू: २८ आक्टोबर १६२७)
१७२० : व्हिटब्रेड हॉटेल्स चे संस्थापक सॅम्युअल व्हिटब्रेड यांचा जन्म. (मृत्यू: ११ जून १७९६)
१८१२ : ब्यूएना विस्टा वाइनरी चे संस्थापक अगोगोस्टन हरसत्थी यांचा जन्म. (मृत्यू: ६ जुलै १८६९)
१८१३ : ना. धों. ताम्हनकर लेखक, बालसाहित्यिक (मृत्यू: ५ जानेवारी १९६१)
१८५० : काशिनाथ त्र्यंबक तेलंग प्राच्यविद्या संशोधक, न्यायमूर्ती, कायदेपंडीत, समाजसुधारक, अखिल भारतीय काँग्रेसचे एक संस्थापक, काँग्रेसचे चिटणीस (१८८५-१८८९), मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू (१८९२), हिंदू कायद्यात सुधारणा होण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. भगवद्गीतेचा त्यांनी इंग्रजीत अनुवाद केला. (मृत्यू: १ सप्टेंबर १८९३)
१८७१ : अर्नेस्ट रुदरफोर्ड नोबेल पारितोषिक विजेते ब्रिटिश भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: १९ आक्टोबर १९३७)
१८८३ : जगन्नाथ गणेश गुणे तथा स्वामी कुवलयानंद योगविद्येचे पुरस्कर्ते व शारीरिक शिक्षणतज्ञ, त्यांनी १९२४ मध्ये 'कैवल्यधाम' नावाची योगशिक्षणसंस्था स्थापन केली. संस्थेतील प्रयोगांची माहिती व्हावी यासाठी 'योगमीमांसा' नावाचे त्रैमासिक काढले. त्याचे ७ खंड प्रकाशित झाले आहेत. (मृत्यू: १८ एप्रिल १९६६ मुंबई)
१९०३ : भगवतीचरण वर्मा हिन्दी कथाकार, कादंबरीकार, कवी, एकांकिकाकार, पटकथाकार व नाटककार, पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित लेखक (मृत्यू: ५ आक्टबर १९८१)
१९०४ : नवल होर्मुसजी टाटा उद्योगपती, पद्मभूषण १९६९
१९२३ : शंकरदास केसरीलाल ऊर्फ 'शैलेन्द्र' गीतकार (मृत्यू: १४ डिसेंबर १९६६)
१९३० : वॉरन बफे अमेरिकन उद्योगपती आणि दानशूर
१९३० : दशरथ पुजारी संगीतकार (मृत्यू: १३ एप्रिल २००८ डोंबिवली, मुंबई)
१९३४ : बाळू गुप्ते लेग स्पिन गोलंदाज (मृत्यू: ५ जुलै २००५)
१९३७ : मॅक्लारेन रेसिंग टीम चे संस्थापक ब्रुस मॅक्लारेन यांचा जन्म. (मृत्यू: २ जून १९७०)
१९५४ : बेलारूस देशाचे पहिले अध्यक्ष अलेक्झांडर लुकासेंको यांचा जन्म.
१९५४ : भारतीय वकील आणि राजकारणी रवीशंकर प्रसाद यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७७३ : सुमेर गार्दी याने नारायणराव पेशवे यांची शनिवारवाड्यात हत्या केली. (जन्म: १० ऑगस्ट १७५५)
१९४० : सर जे. जे. थॉमसन इलेक्ट्रॉनच्या शोधाबद्दल १९०७ चे नोबेल पारितोषिक विजेते इंग्लिश भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: १८ डिसेंबर १८५६)
१९४७ : नारायण मुरलीधर गुप्ते ऊर्फ 'कवी बी' त्यांची 'चाफा बोलेना, चाफा चालेना ' ही कविता खूप प्रसिद्ध आहे. (जन्म: १ जून १८७२)
१९५२ : भारतीय रिजर्व बँकेचे पहिले गव्हर्नर ओसबोर्न स्मिथ यांचे निधन.
१९८१ : जयंत पांडुरंग तथा 'जे. पी.' नाईक शिक्षणतज्ञ, 'इंडियन इन्स्टिट्युट ऑफ एज्युकेशन'चे संस्थापक, 'नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च अँड ट्रेनिंग'चे संस्थापक, भारतामध्ये प्रथमच स्थापन केल्या गेलेल्या शैक्षणिक आयोगाचे सभासद सचिव (जन्म: ५ सप्टेंबर १९०७)
१९९४ : शंकर गोपाळ तथा शं. गो. तुळपुळे प्राचीन मराठी भाषेचे गाढे व्यासंगी, संत वाङ्मयाचे अभ्यासक व संशोधक, पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख (जन्म: ५ फेब्रुवारी १९१४)
१९९८ : नरहर वामन तथा 'नरुभाऊ' लिमये स्वातंत्र्यसैनिक, निर्भिड पत्रकार व काँग्रेसचे तत्त्वनिष्ठ नेते (जन्म: ८ नोव्हेंबर १९०९)
१९९९ चार्ल्स ब्रॉन्सन अमेरिकन अभिनेता (जन्म: ३ नोव्हेंबर १९२१)
२००८ : प्रसिद्ध भरतीय उद्योगपती व बिर्ला कुटुंबातील सदस्य कृष्ण कुमार बिर्ला यांचे निधन.
२०१४ : भारतीय मार्क्सवादी इतिहासकार व आधुनिक भारतातील आर्थिक आणि राजकीय इतिहासातील तज्ञ बिपीन चंद्र यांचे निधन. (जन्म: २७ मे १९२८)
२०१५ : भारतीय विद्वान लेखक एम. एम. कळबुर्गी यांचे निधन. (जन्म: २८ नोव्हेंबर १९३८)

राज्य लोकतंत्र
अहिल्यानगर/जालना
शनिवार दि.३० ऑगस्ट २०२५ ५




# अहिल्यानगर जिल्ह्यातील २२३ गावांना पुराचा धोका

## धरणांमधून विसर्ग सुरूँ जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सज्ज

अहिल्यानगर। प्रतिनिधी

जिल्ह्यातील सर्व धरणसाठे नियंत्रणात ठेवण्यासाठी धरणातून विसर्ग सुरू करण्यात आले आहेत. पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर वाढल्याने पुराचा धोका निर्माण झाला आहे. अतिवृष्टी, धरणातील विसर्ग आणि नदीपात्रातील अतिक्रमणामुळे जिल्ह्यातील आठ प्रमुख नद्यांवरील २२३ गावे पूरप्रवण होत आहेत. तालुकास्तरावर आपत्ती व्यवस्थापन आराखडे तयार करण्यात आले आहेत.

इन्फ्लॅटेबल रबर बोट, लाइफ जॅकेट, रोप, एलईडी टॉर्च आदी मदतीसाठी आवश्यक साधने पुरेशा प्रमाणात आहेत. आपत्तीकालीन परिस्थिती उदभवल्यास मदतीसाठी पाचशे आपदा मित्र साधन सामग्रीसह प्रशिक्षणाने सज्ज आहेत. प्रवरा आणि मुळा या दोन नद्यांचा उगम अकोले तालुक्यात आहे. अकोले तालुक्यात जास्त पाऊस झाल्यावर या दोन्ही नद्यांना पूर येतो. प्रवरा काठावरील १००, तर मुळा काठावरील २४ गावांमध्ये पूरपरिस्थितीचा परिणाम होत



आहे. गोदावरीचा उगम नाशिक जिल्ह्यात असला, तरी कोपरगाव, श्रीरामपूर, नेवासे, शेवगाव तालुक्यांतील ४० गावे पूरप्रवण होतात. नांदूर मधमेश्वर बंधाऱ्यातून विसर्ग सोडल्यानंतर पुराचा धोका निर्माण होतो. अकोले तालुक्यात प्रवरा नदीचा उगम आहे.

जिल्ह्यातील सर्वाधिक १०० पूरप्रवण गावे या नदी काठावर आहेत. अकोले तालुक्यातील अतिवृष्टी हे पुराचे मुख्य कारण ठरत आहे. २००८ मध्ये ३८ हजार ९१३ क्यूसेकचा उच्चांक आहे. मुळा नदीचा उगमही अकोले तालुक्यातील आहे. अतिवृष्टीमुळे पारनेर-संगमनेर तालुक्याच्या हद्दीतील गावांचा संपर्क तुटत असतो. मुळा धरणाची क्षमता २६ टीएमसी असल्याने पुराचे नियंत्रण होत आहे. हे धरणातील पाणीसाठा नियंत्रणात ठेवण्यासाठी नदीपात्रातील विसर्ग वाढवावा लागतो. धरणाच्या खालील गावे पूरप्रवण होतात. संपूर्ण नदी काठावरील २४ गावे हे पूरप्रवण आहेत. भीमा नदीचा उगम पुणे जिल्ह्यातील असून श्रीगोंदे आणि कर्जत तालुक्यातील नदी काठावरील २० गावे पूरप्रवण आहेत.घोडनदीच्या काठावरील श्रीगोंदे तालुक्यातील ११ गावे पूरप्रवण आहेत. सीना नदी काठावरील २० गावे पूरप्रवण, तर खैरी ५ आणि म्हाळुंगी नदी काठावरील ३ गावांचा समावेश आहे. प्रत्येक तालुक्याच्या तहसीलदारांनी आपत्ती व्यवस्थापनाचा कृती आराखडा तयार केलेला आहे. पूरप्रवण गावाजवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्र, उपग्रामीण रुग्णालयामध्ये आवश्यक औषधांचा पुरवठा करण्यात आलेला आहे. स्वस्त धान्याचाही पुरवठा अगोदर संबंधित गावांसाठी केला जात आहे.

# शहरात पुन्हा बस सेवा सुरू करण्याची मागणी



जालना । प्रतिनिधी

अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या वतीने जिल्हा अध्यक्षांच्या नेतृत्वाखाली महानगरपालिका उप आयुक्त नंदा गायकवाड यांना शहरातून बस सेवा सुरू करण्यासाठी लेखी निवेदन देण्यात आले.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, जालना शहरात २०२३ पूर्वी रेल्वे स्टेशन ते स्त्री रुग्णालय या मार्गावर बस सेवा सुरू होती. रस्त्यावरील अडचणींचे कारण देत ही सेवा बंद करण्यात आली. त्यामुळे अंबड ते मुख्य बस स्थानक प्रवास करणाऱ्या प्रवाशांना खासगी वाहनधारकांकडून जादा भाडे आकारले जात असून, सर्वसामान्य ग्राहकांना आर्थिक फटका बसत आहे.

तसेच, रेल्वे स्टेशनलगत असलेले एस.टी. बस स्थानक बंद असून तेथे अतिक्रमण झाले आहे. यामुळे बससेवा पुन्हा सुरू करण्यासाठी सुभाष चौक (बुद्धा बिल्डिंग) परिसरातील फेरीवाल्यांचे अतिक्रमण काढून त्या ठिकाणी ना-फेरीवाला क्षेत्र घोषित करावे व पूर्वीप्रमाणे थांबे निर्माण करावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली.

या वेळी विधी सल्लागार ॲड. एम.जी. सोनुने, प्रांत सदस्य ॲड. डी.पी. पाटील जिल्हा अध्यक्ष डॉ रमेश तारगे आदी उपस्थित होते.

# उद्योजकांच्या मागण्यांना हिरवा कंदिल

## श्रीरामपूर एमआयडीसीत जिल्हा उद्योग मित्र समितीची बैठक



श्रीरामपूर। प्रतिनिधी

श्रीरामपूर एमआयडीसीच्या विकासाला नवे बळ मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. रिकाम्या भूखंडांचे वाटप, रस्ते व स्ट्रिटलाईट दुरुस्ती, पोलिस गस्त वाढवणे अशा उद्योजकांच्या प्रमुख मागण्यांना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी ग्रीन सिग्नल देत सकारात्मक प्रतिसाद दिला. यामुळे औद्योगिक वातावरणाला नवी ऊर्जा मिळेल, असा विश्वास उद्योजकांनी व्यक्त केला.

जिल्हा उद्योग मित्र समितीची बैठक एमआयडीसी कार्यालयात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी प्रांताधिकारी किरण सावंत, तहसीलदार मिलिंद वाघ, एमआयडीसीचे विभागीय अधिकारी गणेश राठोड, जिल्हा अभियंता संदीप बडगे, प्रदूषण नियंत्रण मंडळाचे शिंदे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक दिलीप शिवदास, पोलिस निरीक्षक नितीन देशमुख, एमआयडीसी इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष बाबासाहेब काळे, प्रकाश गांधी, उद्योजक नंदू शिंदे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. बैठकीत काळे यांनी विस्तारासाठी व नव्या उद्योगांसाठी भूखंड वाटप, निवासी झोन, अग्निशमन केंद्र, वाढीव पाणीपुरवठा, प्रवेशद्वारांवर एमआयडीसीच्या कमानी, राष्ट्रीयकृत बँक शाखा सुरू करणे आणि सुरक्षेसाठी पोलिस गस्त वाढवणे अशा मागण्या मांडल्या. यासोबतच औद्योगिक क्षेत्रातील स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि रस्त्यांच्या दुरुस्तीबाबतही त्यांनी लक्ष वेधले. जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी भूखंड वितरण प्रक्रिया गतिमान करण्याची तयारी दर्शवली. रस्ते व स्ट्रिटलाईट दुरुस्ती तातडीने करण्यास मान्यता दिली. निवासी झोन, पाणीपुरवठा योजना आणि प्रवेशद्वारांवरील कमानी यांचे प्रस्ताव वरिष्ठ पातळीवर पाठविण्याचे आश्वासन दिले. सुरक्षेच्या दृष्टीने पोलिस गस्त वाढवण्यासही त्यांनी तत्त्वतः मान्यता दर्शवली. दरम्यान, खंडाळा ग्रामपंचायतीकडे थकलेला कर भरण्यास उद्योजक तयार असून, बदल्यात ग्रामपंचायतीने घनकचरा व्यवस्थापन व साफसफाईची जबाबदारी स्वीकारावी, अशी मागणी करण्यात आली. गटविकास अधिकारी सुभाष म्हस्के यांनी या मागणीला मान्यता दर्शवली. बैठकीनंतर उद्योजकांनी समाधान व्यक्त करत जिल्हाधिकाऱ्यांची सकारात्मक भूमिका ही श्रीरामपूर एमआयडीसीच्या औद्योगिक उन्नतीसाठी मोलाची ठरेल, असे सांगितले.

# केबल चोरी करणारे तीन आरोपी अटक; एक लाख ४० हजाराचार मुद्देमाल जप्त

जालना। प्रतिनिधी

परतुर पोलिस ठाणे हद्दीत सोलर प्लांटवर होणाऱ्या चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी माननीय पोलीस अधीक्षक बंसल यांनी आदेश करून सूचना केल्या होत्या. त्यानुसार दिनांक २७ ऑगस्ट रोजी पोलीस ठाणे परतूरचे पोलीस निरीक्षक सुदाम भागवत यांना मोजे खांडवी तालुका परतुर येथे सोलर प्लांट वरील चोरी ही आरोपी समीर काळे व त्याच्या साथीदाराने केली असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली. यावरून संशयित समीर काळे यास ताब्यात घेऊन विचारपूस केली असता, त्याने सदर चोरी त्याचे साथीदार नामे सय्यद असेफ व शेख गौस याच्यासह केल्याची कबुली दिली.



त्यांच्याकडे इतर गुन्ह्याबाबत चौकशी केली असता त्यांनी इतर तीन गुन्हे मौजे मसला शिवारातील टाटा सोलार येथे केल्याचे कबुली केली आहे. सदर तीनही आरोपींना अटक करून त्यांच्याकडून गुन्ह्यातील चोरीस गेलेला मुद्देमाल माल तांब्याचे वायर किंमत १,४०,०००/ रुपयांचे जप्त केले आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अजयकुमार बसंल,अपर पोलीस अधीक्षक श्री.आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. रामेश्वर रेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे परतुरचे पोलीस निरीक्षक एस.बी.भागवत, पल्लेवाड, पोउपनी अंमलदार अशोक गाढवे, गजानन राठोड, ज्ञानेश्वर वाघ, नरेंद्र चव्हाण, राम हाडे, विजय जाधव, गोविंद पवार अच्युत चव्हाण, नितीन बोंडारे यांनी केली आहे.

# प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे आरोग्य शिबिर संपन्न



अंबड। प्रतिनिधी

अंबड शहरातील विक्रमशिला प्राथमिक निवासी शाळेतील विद्यार्थ्यांचे आरोग्य शिबिर बागूल क्लिनीक अंबड व अरिहंत मेडिकल यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेच्या समोरील पंढरीपार्क येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी संस्थेचे संचालक संजय जाधव अध्यक्ष होते तर प्रमुख पाहुणे म्हणून बागूल क्लिनीकचे संचालक डॉ. राहुल बागूल, अरिहंत मेडिकलचे संचालक डॉ. स्वप्निल देशमाने, पंढरी पार्कचे संचालक बाळासाहेब शिंदे, संस्थेचे योगेश हरणेसर, प्रमोद मस्के सर, सौ. रसिका कानडे मॅडम, सौ. शितल जाधव मॅडम व विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. राहुल बागूल यांनी विद्यार्थ्यांना आरोग्या विषयी मोलाचे मार्गदर्शन केले व आरोग्याची काळजी कशी घ्यावी याविषयी माहीती दिली. तसेच विद्यार्थ्यांची तपासणी करून त्यांना विविध औषधं, क्रिम, साबण, गोळ्या देण्यात आल्या.

# गोंधळलेल्या कारभाराविरोधात अँड.मनोज संकाये यांचा बेशरम आंदोलनाचा इशारा!


परळी प्रतिनिधी

परळीगंगाखेड मार्गावरील धर्मापुरी पाट्याजवळील पुल व त्याच्या अलीकडील नव्या पुलाच्या कामामुळे वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली आहे. कालच तीन ते चार किलोमीटरपर्यंत वाहनांचा लांबलचक रांगा लागून प्रवासी व सर्वसामान्य नागरिकांना चार ते पाच तास प्रचंड त्रास सहन करावा लागला. या विरोधात बेशरम आंदोलन करणार असल्याचा इशारा सामाजिक कार्यकर्ते अँड. मनोज संकाये यांनी दिला आहे. गेल्या चार वर्षापासून पुलाची वर रस्त्याचे काम रखडले आहे. ते अजून पर्यंत चालूच आहे.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या गलथान कारभारामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. ''हा मुद्दा आम्ही वारंवार उपस्थित करून निवेदन सुद्धा दिलेली आहेत.

तरीही जबाबदार विभागाने कोणतीही ठोस पावले उचललेली नाहीत,'' असा संताप स्थानिकांनी व्यक्त केला.

येत्या काळात जर हा प्रश्न मार्गी लागला नाही तर ''बेशरम आंदोलन छेडले जाईल व प्रशासनाला जागे केले जाईल,'' असा इशारा जनतेतून देण्यात आला आहे. दरम्यान, पुलाच्या कामाचा वेग व वाहतूक व्यवस्थापनातील उदासीनता यामुळे या भागात दररोज कोंडीचे चटके बसत असून शालेय विद्यार्थी, रुग्णवाहिका व शेतकऱ्यांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे.



# भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी निवडणूका जिंकण्यासाठी सज्ज रहावे-आ.नारायण कुचे

जालना । प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्रभाई मोदी, गृहमंत्री अमित शहा, राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी.नड्डा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण, माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे, माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर, संतोष दानवे, मा.आ.कैलास गोरंटयाल, मा.आ.विलास बापु खरात, सतिष घाडगे यांच्याशी विचार विनिमय करुन भारतीय जनता पार्टी जिल्हा जालना ग्रामीणची कार्यकारिणी २०२५-२०२८ भारतीय जनता पार्टीच्या घटनेप्रमाणे भाजपा जिल्हाध्यक्ष आ.नारायण कुचे यांनी घोषीत केली. यावेळी आ.नारायण कुचे म्हणाले की, भाजपाच्या नवनिर्वाचीत पदाधिकाऱ्यांने आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूका जिंकण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी संघटन मजबुत करुन सामान्य जनतेचे कामे करुन केंद्र व राज्याच्या जनकल्याणकारी योजना ग्रामीण भागातील जास्तीजास्त नागरीकांपर्यंत पोहचविण्याचे काम करावे असे अवाहन केले.



भारतीय जनता पार्टी जालना ग्रामीण जिल्हा कार्यकारिणी भाजपा जिल्हाध्यक्ष आ. नारायणराव कुचे यांनी भारतीय जनता पार्टीच्या घटनेप्रमाणे जाहिर केली असून त्यामध्ये जिल्हा उपाध्यक्ष १०, जिल्हा सरचिटणीस ५, जिल्हा चिटणीस १०, कार्यालयप्रमुख १, प्रसिध्दीप्रमुख १, कोषाध्यक्ष १ व जिल्हा कार्यकारिणी सदस्य ६२ याप्रमाणे जाहिर केली आहे. भाजपा जिल्हा उपाध्यक्षपदी भाऊसाहेब जाधव, आशाताई माळी, शिंदे, गणेश खवणे, शिवाजी बोबडे, पदमाकर जऱ्हाड, शंकर नारायण लहामंगे, जिजाबाई जाधव, धोका, गणेश ठाले, रमेश भापकर, गोविंद ढेंबरे व भाजपा जिल्हा चिटणीसपदी सचिन जाधव, हरिश्चंद्र शिंदे, राजेश चव्हाण, एकनाथ मोरे, शोभाबाई देशमुख, गंगासागर पिंगळे, ज्योतीताई दिपक ठाकुर, द्वारकाताई देविदास मेहेत्रे, राजु निवृत्ती साळवे, प्रकाश ढवळे व भाजपा जिल्हा कोषाध्यक्षपदी कल्याण रावसाहेब काळे व भाजपा जिल्हा प्रसिध्दीप्रमुखपदी बाबासाहेब कोलते व कार्यालयप्रमुखपदी एकनाथ कारभारी, कानुले व भाजपा जिल्हा कार्यकारिणी सदस्यपदी राजेंद्र देशमुख, मुकेश चिने, गणेश फुके, शिवाजीराव थोटे, तुकाराम जाधव यांच्यासह आदींची निवड करण्यात आली. नवनिर्वाचीत पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# संगमनेरचे आमदार अमोल खाताळ यांच्यावर हल्ला

## सुरक्षारक्षकांनी हल्लेखोर तरुणाला घेतले ताब्यात

संगमनेर। प्रतिनिधी

संगमनेर येथील शिवसेनेचे आमदार अमोल खताळ हे संगमनेर फेस्टिवलच्या उद्घाटन कार्यक्रमास गेले होते. यावेळी संगमनेर तालुक्यातील खांडगाव येथील एका तरुणाने हात मिळवण्याच्या बहाण्याने त्यांच्यावर हल्ला केला. मालपाणी उद्योग समूहाच्या सुरक्षारक्षकांनी हल्लेखोर तरुणाला ताब्यात घेतले आहे. रात्री आठच्या सुमारास ही घटना घडली.



अमोल खताळ यांच्यावरील हल्ल्याची बातमी संगमनेरमध्ये वाऱ्यासारखी पसरली. त्यानंतर खताळ समर्थक आक्रमक झाले. आमदार समर्थकांचा प्रचंड मोठा समूह संगमनेर पोलीस ठाण्याच्या परिसरात जमा झाला आहे. सध्या संगमनेर मध्ये तणावपूर्ण परिस्थिती आहे. माजी मंत्री बाळासाहेब थोरात आणि हिंदुत्ववादी कीर्तनकार संग्राम बापू भंडारे यांच्यातील संघर्षामुळे संगमनेरची चर्चा राज्यात होत असताना गुरुवारी संगमनेरमध्ये ही घटना घडली.

cmyk

राज्य लोकतंत्र

शनिवार, दि.३० ऑगस्ट २०२५ 

# शेतकऱ्यांसाठी खुशखबर माजलगाव धरण ९१.४१ टक्के भरले

## धरणात २५,१७८ क्युसेक्सने आवक सुरुच ;शेतकऱ्यांचा सिंचनाचा प्रश्न कायमस्वरूपी मिटणार

माजलगाव । प्रतिनिधी

येथील जायकवाडी प्रकल्प टप्पा क्रं-२ धरण परिसरातील पाणलोट क्षेत्रात गेल्या काही दिवसांपासून चांगला पाऊस होत असल्याने धरणातील पाणीसाठा झपाट्याने वाढत असून दि २९ ऑगस्ट शुक्रवार रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंत धरणामध्ये पाणीसाठा ९१.४१% टक्क्यांवर पोहोचला असुन धरणात २५,१७८ क्युसेकने पाण्याची आवक सुरू असून धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर कायम राहिल्यामुळे धरणात मोठ्या प्रमाणात आवक सुरू असून,धरण कोणत्याही क्षणी पूर्ण क्षमतेने भरू शकते.त्यामुळे माजलगाव धरणातुन



केव्हांही सिंधफाना नदिपात्रातुन गोदावरी नदीपात्रात पाण्याचा विसर्ग सोडण्यात येणार असल्याने प्रशासनाने सिंदफाना व गोदावरी नदीपात्रातील नागरीकांना सतर्क राहावे असे आवाहन उपविभागीय अधिकारी धरण प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

माजलगाव धरणाच्या पाणलोट क्षेत्रात गेल्या दोन दिवसांपासून मुसळधार पाऊस होत असल्याने माजलगाव धरणाची टक्केवारी झपाट्याने वाढ होत असून दि २९ ऑगस्ट शुक्रवार रोजी सायंकाळी ५:०० वाजता माजलगाव धरणाची टक्केवारी ९१.४१% एवढी झाली असुन माजलगाव धरणांमध्ये पाणलोट क्षेत्रातुन माजलगाव धरणात पाण्याची आवक २५१७८ क्युसेक होत असल्याने व हवामान खात्याने धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पुढील काही तासात अतिवृष्टीचा इशारा दिलेला असल्याने, माजलगाव धरण कोणत्याही क्षणी भरु शकते त्यामुळे धरण व्यवस्थापनाकडून अतिरिक्त पाणी सिंदफणा नदीपात्रात सोडावे लागण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे त्यामुळे सिंधफाना व गोदावरी नदीकाठच्या गावांनी सतर्क राहावे,असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

### नागरिकांना सूचना

✻ नदी, नाले व पुलावरून पाणी वाहत असल्यास धोका घेऊ नये ✻ नदीकाठच्या भागातील नागरिकांनी सतर्क राहावे ✻ शेतकऱ्यांनी आपले जनावरे सुरक्षित ठिकाणी हलवावीत

माजलगाव धरणातील जलसाठा ९१.४१% झाल्याने व धरणात येणारी पाण्याची आवक पाहता धरण कोणत्याही क्षणी पुर्ण क्षमतेने भरु शकते त्यामुळे उपविभागीय अभियंता (जा.प्र. टप्पा-२, उपविभाग क्र. १७, केसापुरी वसाहत) यांच्या पत्राद्वारे माजलगाव तहसीलदार, तहसील कार्यालय, माजलगाव यांना कळविण्यात आले आहे.यंत्रणांकडून परिस्थितीवर बारीक लक्ष ठेवण्यात यावे व नदीकाठच्या गावातील नागरिकांना सतर्क राहण्याच्या सुचना देण्यात यावी.माजलगाव धरणाची दि २९ ऑगस्ट शुक्रवार रोजी सायंकाळी ५:०० वाजेपर्यंतची पाण्याची स्थिती

धरणाची पाणीपातळी
४३१.४६/४३१.८० मी
एकूण पाणीसाठा
४२७.२०/४५४ द.ल.घ.मी.
उपयुक्त पाणीसाठा
२८५.२०/३१२ दलघमी.
टक्केवारी ९१.४१% टक्के
आवक-२५,१७८ क्यूसेक

# नवनियुक्त भाजपा उपजिल्हा प्रमुख सुंदर चव्हाण यांचा जिल्हा कार्यालयात सत्कार

बीड । प्रतिनिधी

भाजपा बीड जिल्हा कार्यकारिणी आणि महाराष्ट्र राज्याच्या मा. मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या आदेशाने नवनिर्वाचित भाजपा बीड जिल्हा उपाध्यक्ष(गेवराई विधानसभा)मा. श्री. सुंदर मदनराव चव्हाण यांचा भाजपा कार्यालय बीड येथे जिल्हाध्यक्ष श्री. शंकर देशमुख व जिल्हा कार्यकारिणी यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. यावेळी भाजपचे बीड जिल्ह्यातील वरिष्ठ नेते व जिप चे गटनेते व पक्षाचे मार्गदर्शक श्री. मदनराव चव्हाण यांचाही सत्कार करण्यात आला. मदनराव चव्हाण यांच्या पक्ष



निष्ठ्यामुळे त्यांच्या कुटुंबाला न्याय देण्याचा प्रयत्न पक्षाने केल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.पक्षाच्या वाढीसाठी व पक्ष तळागाळात पोहोचवण्यासाठी आपण प्रयत्न करणार आल्याचे नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी या वेळी सांगितले.या सत्कार कार्यक्रमासाठी भाजपा जिल्हाध्यक्ष श्री.शंकर भाऊ देशमुख आणि जिल्हाध्यक्ष, नवनाथ अण्णा शिराळे, जिल्हा उपाध्यक्ष, प्राध्यापक नागरगोजे सर, विक्रांत भैय्या हजारे, शांतिनाथ डोरले, जिल्हा सचिव भाजपा, अमोल भैया वडतीले, केशव बडे, घोलप मामा यांच्या हस्ते सुंदर चव्हाण यांचा हृदय सत्कार संपन्न झाला.

# बीड शहरातील सार्वजनिक गणेश मंडळांच्या उत्कृष्ट देखाव्याला मिळणार लाखांचे बक्षीस

## देखावा साकारणाऱ्या गणेश मंडळांनी नाव नोंदणी करावी-डॉ.योगेश, डॉ.सारिका क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

बीडमध्ये सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या 'कल्पतरू प्रतिष्ठान'च्या पुढाकारातून उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सार्वजनिक गणेश मंडळांनी नाव नोंदणी करण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, 'कल्पतरू'च्या सचिव डॉ.सारिका क्षीरसागर यांनी







केले आहे.

गणेश चतुर्थीनिमित्त सार्वजनिक गणेश मंडळ लाडक्या बाप्पाच्या स्वागतासाठी उत्सुक होते. यंदा गणरायाचे आगमन सर्वत्र अतिशय उत्साहात झाले आहे. यावर्षीही 'कल्पतरू'च्या पुढाकारातून आकर्षक देखावे साकारणाऱ्या सार्वजनिक गणेश मंडळांना प्रोत्साहन देण्यासाठी स्पर्धेचे आयोजन केले आहे. देखाव्यांमध्ये

◀◀ पान ३ वर

### अशी असतील बक्षिसे; उत्तेजनार्थ मंडळांनाही रोख बक्षिस दिले जाणार

पहिल्या क्रमांकाच्या उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळास १ लाख, द्वितीय क्रमांकास ७५ हजार, तृतीय क्रमांकास ५१ हजार व सन्मानचिन्ह, तसेच उत्तेजनार्थ मंडळांनाही रोख रक्कम बक्षिस स्वरूपात दिली जाणार आहे. दरम्यान, हा बक्षीस वितरण सोहळा गणेशोत्सव कालावधीत आयोजित केला जाईल, अशी माहिती संयोजकांनी दिली आहे.

# म्हसोबावाडी येथील विद्यार्थी पाण्याअभावी करतात तब्बल दिड ते दोन किलोमीटरचा पायी प्रवास

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील म्हसोबाचीवाडी हनुमान नगरपांढरीयेथील लोकवस्ती व या ठिकाणी असणारं पुरातन पावन हनुमान मंदिर आहे...पण अडचण अशी की या वस्तीला चहू बाजूंनी कमलेश्वरी नदीचा वेढा आहे त्यामुळे या ठिकाणी येणाऱ्या भाविकांना दर्शनासाठी येण्यासाठी व ६०/७० लोकसंख्या असलेल्या येथील लोकवस्तीतील लोकांना खूप त्रास सहन करावा लागत



## लोकप्रतिनिधी यांचे होते वारंवार दुर्लक्ष

आहे...शालेय विद्यार्थ्यांना जाण्यायेण्यासाठी जीवाशी खेळून नदीपात्र पार करून शाळेत जावं लागतं येथील लोकवस्ती वरील लोकांना विशेषतः पाऊस कल्यातिल ४/६ महिने हे जिवाशी खेळून काढावे लागतात रोजच्या दैनंदिन जीवनात अनेक गोष्टींसाठी जाणंयेणं करावं लागतं शेतीसाठी आवश्यक असणारे साधनं या वस्तीला नदीमुळे वेळेला हजर होत नाहीत म्हणुन लोकवस्तीतील लोकांचे अर्थकारण ही खुप धोक्यात येत आहे... या विषयीक अडचणीचे वेळोवेळी ◀◀ पान ३ वर

# दामिनी पथकाच्या जिल्ह्यातील विविध शाळा व कॉलेजला भेटी

बीड । प्रतिनिधी

दामिनी पथक प्रमुख पल्लवी जाधव यांनी दिनांक २५ ऑगष्टला ला स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय आंबेजोगाई येथे भेट दिली. तसेच, दिनांक २८आऑगष्ट रोजी गोरक्षनाथ विद्यालय व कनिष्ठ महविद्यालय ढेकणमोहा ता. जि. बीड येथे भेट देवून, येथील मुलीसह विद्यार्थ्यांना बालकांचे अधिकार, बाल लैंगिक अत्याचार अधिनियम, गुडटच-बॅडटच, बालविवाह प्रतिबंध कायदा, महिलांना भारतीय संविधानाने दिलेले मुलभूत अधिकार या कायद्याबाबत तसेच धुम्रपान करू नये, मोबाईलचा अतिवापर टाळावा, अशा अनेक विषयावर मार्गदर्शन केले.

मुलींनी दैनंदिन वापराच्या वस्तूने



## विद्यार्थ्यांना कायदेविषयक जनजागृतीपर मार्गदर्शन

आत्मसंरक्षण कसे करायचे याबाबत माहिती देण्यात आली. यावेळी ५०० ते ६०० विद्यार्थी हजर होते. त्यांना तत्काळ मदती साठी टोल फ्री हेल्पलाईन ११२, १०९१, १०९८ वर कॉल करणे तसेच ऑफिस कडून तयार करण्यात आलेला कोड वर तक्रार करणेबाबत सांगितले.त्याचप्रमाणे दामिनी पथक हे शहरात तसेच तालुक्याच्या ठिकाणी जावून बस स्टँड, शाळा, कॉलेजच्या समोर, क्लासेस अशा वर्दळीच्या ठिकाणी गस्त करुन, मागच्या दोन महिन्यात १०० च्या वर रोडरोमियोवर मुंबई पोलीस अधिनयम अन्वये ११०/११७ नुसार प्रतिबंध कारवाई करण्यात आल्या आहेत.

# वडवणी पोलिसांच्या सतर्कतेमुळे हरवलेली दोन भावंडे सापडली

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरांमध्ये एक पाच वर्षाचा मुलगा आणि सात वर्षाची मुलगी अशी दोन भावंडे हरवली होती. मात्र पोलिसांनी तात्काळ याची दखल घेऊन शोधाशोध केल्याने वडवणी शहरातील पाटील गल्लीमध्ये ही दोन्ही मुकी भावंडे सापडली मुलांच्या आजीने पोलिसांचे आभार मानले.




दिनांक २९ ऑगस्ट रोजी माजलगाव येथील कलाबाई मच्छिंद्र शिंदे (वय ५५) या आपल्या नातेवाईक सुमित्रा मासुळे रा. रमाबाई नगर वडवणी यांच्याकडे कार्यक्रमासाठी आल्या होत्या त्यावेळी त्यांनी त्यांची दोन नातवंडे सोबत आणली होती. मात्र अकरा वाजण्याच्या सुमारास ही दोन्ही मुले खेळत खेळत घरापासून लांब गेली. त्यांच्या आजीने त्यांची दोन ते तीन तास शोधाशोध केली. मात्र ही मुले मिळून आली नाहीत. त्यानंतर वडवणी पोलिसांना याची माहिती देण्यात आली.स.पो.नि. वर्षा व्हगाडे यांनी त्यांची चौकशी करून तात्काळ स्वतः कर्मचाऱ्यासह शहरात शोध घेतला. बस स्थानकातील ◀◀ पान ३ वर

### गौरी महालक्ष्मी सजावट स्पर्धेत सहभागी व्हा-आर्दड

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांनी सालाबादाप्रमाणे याहीवर्षी गौरी महालक्ष्मी सजावट स्पर्धेचे आयोजन केले आहे. गेवराई शहर आणि ग्रामीण अशा दोन गटांत ही स्पर्धा गेवराई विधानसभा मतदार संघातील महिला भगिनींसाठी आयोजित



केली आहे. गौरी महालक्ष्मी सजावट स्पर्धेतील विजेत्यांना प्रथम रु.१५ हजार, द्वितीय रु.११ हजार, तृतीय रु.७ हजार आणि उत्तेजनार्थ प्रत्येकी तीन विजेत्यांना रु.३ हजार रोख व सन्मानचिन्ह शहर आणि ग्रामीण अशा दोन्ही गटांसाठी दिले जाणार आहेत. इच्छुक स्पर्धकांनी दि.३१ ऑगस्टपूर्वी नोंदणी करण्याचे आवाहन गेवराई ◀◀ पान ३ वर

# नियमाचे पालन करणाऱ्या गणेश मंडळांना पोलीस 'गणराया अवार्ड' देणार

बीड । प्रतिनिधी

बीड शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये गणेशोत्सवात सर्व नियमाचे पालन करणाऱ्या गणेश मंडळांना पोलीस दलाच्या वतीने गणराया अवार्ड साठी निवडण्यात येणार आहे.

यासाठी भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवून आदर्श पूर्वक पर्यावरण पूरक गणेश उत्सव साजरा करणारे मंडळ, डीजे मुक्त, गुलाल मुक्त मिरवणूक करणारे मंडळ, विसर्जन कसे करणार त्याची वेळ ठरवून घेणारे मंडळ, सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरा चा वापर करून सीसीटीव्ही कॅमेऱ्याची जागृती करणारे मंडळ, दर्शनासाठी उत्तम व्यवस्था अनुषंगाने योग्य बॅरिकेटिंग, महिला पुरुष यांसाठी स्वतंत्र रांगा, गणेश भक्तांसाठी व्यवस्था करणारे मंडळ. सजावट, इको फ्रेंडली मूर्ती, आकर्षक प्रेरणादायी देखावे करणारे मंडळ, सामाजिक उपक्रम, राष्ट्रीय एकात्मतेसाठी सहाय्य करणारे उपक्रम राबवणारे मंडळ. व्यसनमुक्ती वर काम करणारे मंडळ. अशा मंडळांना हे पुरस्कार देण्यात येतील. या स्पर्धेत सहभागी मंडळाने २९ ऑगस्ट रोजी बीड शहर पोलीस ठाण्याच्या गणेशोत्सव व्हाट्सअप ग्रुप वर सहभाग घेत असल्याबाबत कळवणे आवश्यक आहे. गणराया अवार्ड परीक्षणासाठी प्राध्यापक, डॉक्टर ,धर्मगुरू यांची समिती नेमण्यात येईल. आपण आपल्या गणेश मंडळांनी केलेल्या उपक्रमाचे सादरीकरण, कागदपत्र, फाईल, कलर प्रिंट तयार ठेवावी. परीक्षा समिती भेटीचे वेळी प्रत्यक्ष मंडळाचे पहाणीआणि त्यांनी केलेले प्रेझेंटेशन या बाबी महत्त्वाच्या असल्याने आपण आपल्या पदाधिकाऱ्यांसह स्थापना ठिकाणी उपस्थित राहण्याचे आवाहन बीड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक एस. आर .बल्लाळ यांनी केले आहे.

# बीड-निरगुडी-पिंपळवंडी-अंमळनेर- धामणगाव-अहिल्यानगर प्रमुख राज्य मार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य

## पंख्यावर वाढलेली झाडे झुडपे देतात अपघातास आमंत्रण; आ. धस रस्ता विकास कामाबाबत सतत कार्यरत

पिंपळवंडी । प्रतिनिधी

बीड- लिंबादेवीफाटा-डोंगरकिन्ही- पिंपळवंडी-अंमळनेर-धामणगाव- दौलावडगाव-अहिल्यानगर या प्रमुख राज्य रस्ता क्रमांक २२२ रस्त्याची दयनीय अवस्था बनली असून रस्त्यावर अनेक ठिकाणी डांबर पूर्णपणे उखडून खडी उघडी पडून रस्त्यावर अनेक ठिकाणी मोठ मोठाले खड्डे पडून या खड्डयात पावसाचे पाणी साचत असल्याने या रस्त्याने प्रवास करणाऱ्या वाहनधारकांना प्रचंड हाल सहन करत प्रवास करावा लागत आहे.पावसाचे पाणी खड्डयात साचल्याने त्या खड्डयाचा वाहनधारकांना अंदाज येत नाही,व पाणी साचल्याने खड्डे दिसत नाहीत, त्यामुळे खड्डयात वाहने आढळून अपघात होण्याच्या घटना घडत आहेत.व वाहने घसरून वाहनधारक जखमी होतात.लिंबादेवी-निरगुडी-



गारमाथा-डोंगरकिन्ही-पिंपळवंडी-अंमळनेर-धामणगाव-दौलावडगाव हा बीड ते अहिल्यानगर जिल्हा प्रमुख ◀◀ पान ३ वर



# पाटोद्यामध्ये सगळीकडे सिमेंट रस्ते, पुलावर मात्र खड्डेच खड्डे

पाटोदा । प्रतिनिधी

शहरातील अनेक लहान-मोठ्या गल्लयांमध्ये नगरपंचायतच्या वतीने सिमेंटचे रस्ते मागील पाच ते सहा वर्षाच्या कालावधीत तयार करण्यात आले आहेत. मात्र, शहरातील मुख्य प्रवेशद्वार असलेल्या मांजराच्या नदीच्या पुल हा पूर्णतः उखडलेला असून, सर्वत्र खड्डेच खड्डे पडले आहेत.याचा नाहक त्रास येथील व्यापारी व येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना सोसावा लागत आहे.



पाटोदा शहरातील मांजरा नदीवरील पुलावर कधी सिमेंटचा रस्ता तर कधी डांबरी रस्ता मोठा गाजा- वाजा करून तयार करण्यात येतो परंतु एक दोन महिन्यात. निकृष्ट कामामुळे पुन्हा काही महिन्यांत पुन्हा खड्डेच खड्डे पडलेले दिसतात यामुळे येणाऱ्या गणेश उत्सवात तरी संबंधित विभागाने उत्कृष्ट रस्ता करून जनसामान्याचे रहदारीचे अडथळे दुर करावेत अशा मागणी येथील नागरिक करत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

# नवीन थेरगाव रुग्णालयात पहिली युरोलॉजी शस्त्रक्रिया यशस्वी!

## पिंपरी चिंचवड महापालिकेच्या रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टर व आरोग्य कर्मचाऱ्यांचे मोलाचे योगदान

पिंपरी, दि. २९ ऑगस्ट २०२५ : पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नवीन थेरगाव रुग्णालयात युरोलॉजी विभागातील पहिली मोठी शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण झाली आहे. ६४ वर्षीय रुग्णास मूत्रपिंडात अनेक गाठी असल्यामुळे दाखल करण्यात आले होते. या रुग्णास मधुमेहजन्य आम्लता (डायबेटिक केटोॲसिडोसिस), डाव्या हृदयपिंडाच्या स्नायूंची वाढ (लेफ्ट व्हेंट्रिक्युलर हायपरट्रॉफी) व डायस्टॉलिक डिसफंक्शन अशा गुंतागुंतीच्या तक्रारीही होत्या.



शस्त्रक्रियेपूर्वी रुग्णाची तब्येत स्थिर ठेवण्यासाठी ॲनेस्थेशिया व मेडिसिनविभागाने समन्वय साधून आवश्यक ती पूर्वतयारी केली. या शस्त्रक्रियेसाठी जनरल ॲनेस्थेशिया देण्याची जबाबदारी डॉ. अर्चना गांधी, डॉ. पूजा कुलकर्णी, डॉ. पूनम माने व डॉ. अर्जित रेपुरिया यांनी सांभाळली. शस्त्रक्रियेच्या वेळी रुग्णाच्या रक्तातील साखरेचे प्रमाण, श्वसन-रक्ताभिसरण संतुलन तसेच शस्त्रक्रियेतील स्थिती यांचा विशेष विचार करून काटेकोर व्यवस्थापन करण्यात आले.

शस्त्रक्रिया युरोसर्जन डॉ. सुनील पालवे आणि डॉ. हनुमंत फड यांनी कौशल्यपूर्णरीत्या पूर्ण केली. मूत्रपिंडाच्या वरच्या व खालच्या भागाला लागून असलेली तब्बल १० १० सें.मी. आकाराची गाठ यशस्वीरीत्या काढण्यात आली. संपूर्ण शस्त्रक्रिया कोणतीही गुंतागुंत न होता सुरळीतपणे पूर्ण झाली. ही शस्त्रक्रिया आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांच्या मार्गदर्शनाखाली व अतिरिक्त आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. अभयचंद्र दादेवार यांच्या नेतृत्वात पार पडली. यावेळी रुग्णालयप्रमुख डॉ. राजेंद्र फिरके व डॉ. संजय सोनेकर तसेच ऑपरेशन थिएटर तंत्रज्ञ व परिचारिका टीमचे योगदान मोलाचे ठरले.


**नवीन थेरगाव रुग्णालयात युरोलॉजी विभागातील पहिली मोठी शस्त्रक्रिया यशस्वी होणे ही पिंपरी चिंचवड महापालिका वैद्यकीय विभागासाठी अभिमानाची बाब आहे. महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचे आमचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत. त्यामुळे नागरिकांना उत्तम उपचार सेवा स्थानिक पातळीवर मिळण्यास मदत होत आहे.**

**– विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

**युरोलॉजी विभागात झालेल्या शस्त्रक्रियेत ॲनेस्थेशिया, मेडिसिन, युरोलॉजी तसेच नर्सिंग अशा सर्व विभागांनी एकत्रितपणे काम करून उत्कृष्ट समन्वय साधला. त्यामुळेच ही शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण करणे शक्य झाले झाले.**

**– डॉ. लक्ष्मण गोफणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी, पिंपरी चिंचवड महापालिका**

## विद्यापीठाजवळील उड्डाणपुलाच्या कामात अनेक त्रुटी; वाहनचालकांची तीव्र नाराजी



पुणे । प्रतिनिधी

**राजभवन ते रिझर्व्ह बँकेदरम्यान दुमजली उड्डाणपुल उभारण्यात आला आहे. दुमजली उड्डाणपुलाच्या कामात अनेक त्रुटी आढळून येत असल्याने वाहनचालकांकडून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. औंध-शिवाजीनगर मार्गावर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मंत्र्यांच्या उपस्थितीत मोठ्या थाटामाटात उद्घाटन करण्यात आले होते. असे असले तरी प्रत्यक्षात कामाचा दर्जा समाधानकारक नसल्याचे चित्र समोर येत असल्याचे दिसत आहे.**

वाहनधारकांच्या म्हणण्यानुसार पूल सुरू झाल्यानंतर अवघ्या काही दिवसांतच रस्त्यावर त्रुटी दिसू लागल्या आहेत. स्वागत फलक देखील पडून आहेत, रस्त्यावर खडी पसरल्याने अपघाताचा धोका वाढला आहे, तर दिशादर्शक फलक नसल्यामुळे वाहनधारकांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण होत आहे. पूल चढताना दुचाकीस्वारांना अडचण जाणवत आहे. जोड दिलेल्या ठिकाणी समतल पातळी नसल्याने गाड्या आदळून धक्के बसतात. कडेला घाण साचल्याने पुलाचा परिसर जुना आणि निकृष्ट वाटतो, अशी खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे. रस्त्यावरील जोड योग्य पद्धतीने न दिल्यामुळे नंतर डांबर टाकून ती दुरुस्ती केली गेली आहे, मात्र त्यामुळे उंच-सखल भाग निर्माण झाले आहेत. अनेक ठिकाणी रस्ता समान पातळीवर नसल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. परिणामी, अपघाताचा धोका वाढल्याची तक्रार वाहनचालकांनी केली आहे.

## बोलण्यास नकार; बाणेरमध्ये प्रेयसीवर गोळीबाराचा प्रयत्न

पुणे । प्रतिनिधी

प्रेमसंबंधाला झिडकारल्याने व बोलण्यास नकार दिल्याने एकाने प्रेयसीवर पिस्तुलातून गोळीबार केल्याची घटना बाणेर येथे शुक्रवारी सकाळी घडली. मात्र, पिस्तुलातून गोळी न उडाल्याने उच्चशिक्षित प्रेयसी तरुणी बचावली. या घटनेतील आरोपी पसार झाला असून त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून आरोपीचा शोध घेण्यात येत आहे.



तक्रारदार तरुणी ही उच्चशिक्षित असून ती 'एमबीए' चा अभ्यासक्रम पूर्ण करत आहे. तसेच ती बाणेर भागातील एका खासगी कंपनीत प्रशिक्षण घेत आहे. शुक्रवारी ती सकाळी दहाच्या सुमारास कंपनीत निघाली होती. आरोपीने घरपोच खाद्यपदार्थ पोहोचविणाऱ्या 'डिलिव्हरी बॉय'सारखा वेश करत कंपनीच्या आवारात आला व तिला अडविले व तिच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला.

तिने बोलण्यास नकार दिल्याने आरोपीने त्याच्याकडील पिस्तुलातून तरुणीच्या दिशेने गोळ्या झाडण्याचा प्रयत्न केला. मात्र, पिस्तुलातून गोळी न उडाल्याने ती बालंबाल बचावली. त्यावेळी तरुणीने आरडाओरडा केला. त्यानंतर कंपनीतील कर्मचारी, सुरक्षारक्षकांनी तेथे धाव घेतली. आरोपी दुचाकीवरून पसार झाला.

## जरांगे यांनी चर्चेतून मार्ग काढावा-सदाभाऊ खोत

इंदापूर: मराठा आरक्षण आंदोलन पुन्हा पेटले असून, मुद्दा ऐरणीवर आलेला आहे. तो प्रश्न शेतीशी संबंधित असून शेती व्यवसायाचा दुय्यम धंदा पशुपालनाचा आहे, तोही गोरक्षक करू देत नाहीत. मराठा समाज कर्जबाजारी आणि यातूनच अनेक युवक आत्महत्या करीत आहेत. मनोज जरांगे यांनी चर्चेतून मार्ग काढावा. संपूर्ण राज्य तुमच्या चर्चेकडे आस लावून बसले असल्याचे मत विधान परिषदेचे आमदार, माजी मंत्री सदाभाऊ खोत यांनी व्यक्त केले.



इंदापूर येथे न्यायालयीन कामकाजासाठी आल्यानंतर खोत पत्रकारांशी बोलत होते. ते म्हणाले, राज्य स्थापनेपासून झालेल्या मुख्यमंत्र्यांनी मराठा समाजाच्या युवकांसाठी फार काही केले नाही. केवळ शेतीचं पाणी,अनुदान दिलं मात्र शिक्षण, नोकरी आरक्षणात पाटील, देशमुख आणि पवार यांनी आरक्षण दिले नाही.

मराठा समाजाची लेकरं जिल्हाधिकारी, तहसीलदार होऊन आमच्या पंक्तीला बसावं असं यांना वाटलं नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मात्र एकदा नव्हे तर दुसर्यांदा मराठा समाजाला आरक्षण दिलं आहे. यावेळी रयत क्रांती पक्षाचे राज्याध्यक्ष प्रा. सुहास पाटील, रयत सेनेचे जिल्हाध्यक्ष नीलेश देवकर, तालुकाध्यक्ष अभिमन्यू शिंदे हे उपस्थित होते.

शेतकर्यांच्या गोठ्याला गोशाळा अनुदान द्या

प्रत्येक शेतकर्यांचा गोठा गोशाळा समजावी. गोशाळेला जितके अनुदान देता तितकेच अनुदान शेतकर्यांच्या गोठ्यात जेवढी जनावरे आहेत, त्यांना प्रत्येकी पाचशे रुपयेप्रमाणे अनुदान दिवसाला द्यावे. यापूर्वी गोशाळेविरोधात कोण बोलत नव्हते मात्र आता शेतकर्यांच्या नरडीला आल्याने बोलणे भाग पडत आहे.

## रुईत दोन गटांत मारामारी; नऊ जणांवर गुन्हा

बारामती । प्रतिनिधी

**बारामती शहरातील रुई भागात दोन गटांत जोरदार मारामारी झाली. याप्रकरणी बारामती तालुका पोलिस ठाण्यात परस्परविरोधी फिर्याद दाखल करण्यात आली आहे. पोलिसांनी दोन्ही बाजूच्या नऊ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.**

गजानन देविदास शिंदे (रा. जामदार रोड, बारामती) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सुरेंद्र काजळे, सागर काजळे, कुंदन काजळे (रा. तांदूळवाडी, बारामती) व हेमंत भिसे (रा. सावळ, ता. बारामती) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. (डरींशीीं झींपश छ्शुा)

दि. २४ रोजी रात्री ११.५० वाजता रुई गावच्या हद्दीत पालखी महामार्ग पुलाच्या पुढे हा प्रकार घडला. आरोपींनी फिर्यादीची गाडी आडवून शिवीगाळ करत गाडीतून उतरण्यास सांगितले. फिर्यादी यांनी गाडीमध्ये माझी गरोदर पत्नी आहे, असे सांगितले. त्यावर सागर काजळेने मी बारामतीचा भाई आहे, असे सांगत शिंदे यांना गाडीतून ओढून मारहाण केली.



त्यावेळी सुरेंद्र काजळेने कोयता उलट्या बाजून शिंदे यांच्या डोक्यात मारून दुखापत केली. कुंदन काजळेने रॉड खांद्यावर मारून दुखापत केली. हेमंत भिसे व दोन अनोळखी इसमांनी हाताने लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.तसेच ठार मारण्याची धमकी दिली. फिर्यादीची पत्नी सायली शिंदे यांनी नवर्याला मारू नका असे सांगितले असता त्यांनाही शिवीगाळ, दमदाटी करण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.दुस-या बाजूने सुखसागर सुनील काजळे (रा. तांदूळवाडी, कल्याणीनगर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार गजानन शिंदे (रा. कसबा, बारामती), रवी गुटाळ, शुभम ठाकूर, वैभव क्षीरसागर (रा. रुई, बारामती) व अन्य तीन अनोळखी व्यक्तींविरोधात पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.फिर्यादी कामगार हेमंत रतीलाल भिसे यांना घरी सोडून रूई पाटी येथे जात असताना आरोपी गजानन शिंदे व त्यांच्या सोबतच्या अन्य लोकांनी गाडी थांबवली. गजानन शिंदे याने शिवीगाळ करत फिर्यादीच्या डोक्यात दगड मारला. सोबतच्या रवी गुटाळ, शुभम ठाकूर, वैभव क्षीरसागर व अन्य तिघांनी फिर्यादीच्या डोक्यात दगड मारला.

तसेच मारहाण करत दुचाकीचे नुकसान केले. फिर्यादी दुचाकी तेथेच सोडून पळून गेले. कोयता, दगडाने त्यांची गाडी चेंबवण्यात आल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

## पुणे महापालिकेच्या प्रभाग रचनेवर आत्तापर्यंत केवळ ३८० हरकती

पुणे । प्रतिनिधी

पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी जाहीर करण्यात आलेल्या प्रारूप प्रभाग रचनेवर आत्तापर्यंत केवळ ३८० हरकती आलेल्या आहेत. बहुतांश हरकती या खराडी आणि सिंहगड रस्त्यांवरील प्रभागांमधील आहेत.

खराडी येथील थिटे वस्तीतील तब्बल १३० नागरिकांनी एक सारखीच हरकत दाखल केली आहे. दरम्यान गणेशोत्सव सुरु असल्याने बहुतांश राजकीय कार्यकर्ते त्यात व्यस्त असल्याने हरकती कमी असल्याचे सांगण्यात येत आहे.





राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार महापालिका निवडणुकीसाठी २२ ऑगस्टला प्रारूप प्रभाग रचना जाहीर केली. त्यानंतर ४ सप्टेंबरपर्यंत हरकती सूचना मागविण्यासाठी मुदत आहे. २०२२ च्या वेळी तीन सदस्याची प्रभाग रचना होती. तेव्हा अडीच हजारापेक्षा जास्त हरकती नोंदविल्या गेल्या होत्या. त्या तुलनेत यावेळी हरकती व सूचना कमी आल्या आहेत.

ही प्रभाग रचना भाजपच्या फायद्याची असल्याचा आरोप महायुतीतील घटक पक्षांसह महाविकास आघाडीकडून केला जात आहे. खासदार सुप्रिया सुळे यांनी तर हरकती सूचना नोंदविण्यासाठी मुदतवाढ द्यावी अशी मागणी केली आहे.

पुण्यात सध्या गणेशोत्सवाची धामधूम सुरु आहे. राजकीय पक्षाचे कार्यकर्ते, इच्छुक उमेदवार हे गणेशोत्सवाच्या कामात व्यस्त आहेत. त्यामुळे हरकती सूचना नोंदविण्याकडे दुर्लक्ष झाले आहे. पण अंतिम टप्प्यात या हरकती, सूचना नोंदविण्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे.

हरकती, सूचनांचे स्वरूप

प्रभागांचे नाव बदला. एक सोसायटी दोन प्रभागात विभागली जाणे. नैसर्गिक हद्दी ओलांडून प्रभाग रचना केली आहे' प्रभाग मोठा झाल्याने क्षेत्रीय कार्यालय जवळचेच असावे. प्रभाग मोठा झाल्याने प्रभागाचा काही भाग दुसऱ्या प्रभागाला जोडावा. समाविष्ट गावांची ओळख होईल असे प्रभागाचे नाव असावे.

## मनविसेने आयुक्तालयात लावला तो व्हिडिओ; पोलीस आयुक्तांचा कठोर इशारा



पुणे । प्रतिनिधी

राजा रावबहादूर मिल्स येथील किकी पबमध्ये फ्रेशर्स पार्टी थांबवून आंदोलन केलेल्या महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेने (मनविसे) आता थेट पोलीस आयुक्तालयात हजेरी लावत 'तो धक्कादायक व्हिडिओ' दाखवला. या व्हिडिओमध्ये एका पोलीस कर्मचाऱ्याचा पबमध्ये खाकी वर्दीत नाचतानाचा क्षण कैद झाला असून, त्याने प्रशासनालाच चक्रावून टाकले.

मनविसेच्या शिष्टमंडळाने आयुक्तांना भेटून पुण्यातील पब-क्लबमधील बेकायदेशीर धंदे, ड्रग्स रॅकेट, रहिवाशांचा त्रास, वाहतूक कोंडी आणि हरवत चाललेली पुण्याची सांस्कृतिक ओळख यावर थेट चर्चा केली. यावेळी पदाधिकाऱ्यांनी पुराव्यांसह अनेक धक्कादायक प्रकार समोर आणले.

युवकांचे भविष्य उद्ध्वस्त करणाऱ्या पब-क्लबविरोधात पोलिस प्रशासन कठोर कारवाई करेल. सामाजिक हितासाठी तुम्ही लढत असताना प्रशासन नेहमीच तुमच्या पाठीशी उभे राहील.

मनविसेचे शहराध्यक्ष धनंजय दळवी यांच्या नेतृत्वाखालील प्रतिनिधीमंडळात प्रशांत कनोजिया, आशिष साबळे, सचिन पवार, अभिषेक थिटे, रुपेश घोलप, विक्रांत भिलारे, हेमंत बोळगे, आशुतोष माने, केतन डोंगरे, संतोष वरे, निलेश जोरी, मयुर शेवाळे, अक्षय पायगुडे यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

## शिवसृष्टीमुळे बारामतीचे पर्यटन महत्त्व वाढेल-उपमुख्यमंत्री अजित पवार

बारामती । प्रतिनिधी

शिवसृष्टीमुळे पर्यटकांना इतिहासाची ओळख आणि त्यातून प्रेरणा मिळेल. तसेच बारामतीचे सांस्कृतिक व पर्यटन महत्त्व अधिक वाढेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित यांनी व्यक्त केला.उपमुख्यमंत्री पवार यांनी बारामती परिसरातील विविध विकासकामांची पाहणी केली.

शिवसृष्टी, कन्हेरी वन उद्यान परिसर, तांदुळवाडी येथील वृद्धाश्रम तसेच तिरंगा चौकाची पाहणी करून अधिकाऱ्यांना सूचना केल्या. यावेळी खासदार सुनेत्रा पवार उपस्थित होत्या.पवार यांनी शिवसृष्टी या ऐतिहासिक थीम पार्क परिसरातील कॅनॉल शेजारील रस्त्याची पाहणी केली. सुधारित कामासाठी सूचना दिल्या.

याठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन प्रवासाचे दर्शन घडवणाऱ्या अनेक भव्य प्रतिकृती उभारण्यात येणार आहेत. यामध्ये शिवकाळातील सदरा व आग्रा दरबार, शिवकालीन बाजारपेठा व राजसभा, राजगड प्रवेशद्वाराची प्रतिकृती, शिवकालीन आरमार आणि माहितीपट व थ्रीडी निमेशनद्वारे शिवकालीन युद्धाचा प्रत्यक्ष अनुभव घेता येणार आहे.

पवार यांनी बारामतीच्या वनपरिक्षेत्र अंतर्गत उभारण्यात आलेल्या कन्हेरी वन उद्यान परिसरातील विकासकामांची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांकडून कामाच्या संदर्भातील माहिती जाणून घेतली. यावेळी 'डव्हेंचर अँड नेचर क्लब'मार्फत साहसी खेळांच्या प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप झाला.

याप्रसंगी १४ प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. अशा उपक्रमांच्या माध्यमातून युवा वर्गाला रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होतील. बारामतीच्या पर्यटनाला चालना मिळेल, असा विश्वासही उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

यावेळी उप वनसंरक्षक महादेव मोहिते, उप विभागीय अधिकारी वैभव नावडकर, एमआयडीसीचे प्रादेशिक परिवहन अधिकारी हनुमंत पाटील, उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमोल पवार, पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल उपस्थित होते.

## अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या महिला पोलिस अधिकाऱ्याला न्यायालयाचा

पुणे । प्रतिनिधी

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर महिला वरिष्ठ पोलिस निरीक्षकाच्या बदलीचा आदेश प्रशासकीय न्यायाधिकरणाने रद्द करत पोलिस प्रशासनाला जबर धक्का दिला आहे. हा आदेश 'मनमानी' आणि 'सूडबुद्धी'ने घेतल्याचे स्पष्ट निरीक्षण न्यायाधिकरणाने नोंदवले असून, या निर्णयामुळे संबंधित महिला अधिकाऱ्यास मोठा दिलासा मिळाला आहे.

जुलै २०२४ मध्ये पुणे शहरात बदली होऊन दाखल झालेल्या या महिला निरीक्षकाला जून २०२५ मध्ये बंदोबस्त ड्युटीवर असताना शिवाजी रस्त्यावर विनयभंगाचा सामना करावा लागला. धाडसाने त्यांनी तत्काळ वरिष्ठांना कळवून फरासखाना पोलिस ठाण्यात सराईत गुन्हेगार आणि भाजपचा कार्यकर्ता प्रमोद कोंढरेविरुद्ध गुन्हा दाखल केला.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर अतिरिक्त आयुक्तांनी संबंधित अधिकारी महिलेला अन्य ठिकाणी बदली स्वीकारण्याचा सल्ला दिला. मात्र, त्यांनी ठामपणे नकार देत सांगितले, 'मी गुन्हा दाखल केला आहे, आता बदली झाली तर समाजात चुकीचा संदेश जाईल.' त्यानंतर त्या रजेवर गेल्या. रजेवरून परत आल्यानंतर २१ जुलैला त्यांना वाहतूक शाखेत बदली झाल्याचा आदेश मिळाला. हा आदेश पोलिस स्थापना मंडळाच्या निर्णयानुसार घेतल्याचे सांगण्यात आले.

यासाठी ना कारणे दाखवा नोटीस, ना चौकशी , मात्र दोन दिवसांत अहवाल तयार करून आदेश जारी केले गेला . या विरुध्द त्या प्रशासकीय न्यायालयात गेल्या. तेथे त्यांनी त्यांच्यावर शिस्तीभंगाची कधीही कारवाई झालेली नाही, उलट प्रशस्तीपत्रे आणि पुरस्कार मिळालेले असतानाही असा आदेश काढल्याची बाजू मांडली. न्यायाधिकरणाने सर्व कागदपत्रे तपासून आदेश रद्द केला आणि प्रशासनावरच प्रश्नचिन्ह उभे केले.